# १

## भारतीय तत्त्वज्ञान

**घटक रचना**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रारंभ

  १.२.१ वैदिकांचे विश्वशास्त्र

  १.२.२ एकेश्वरवाद

  १.२.३ ऋत संकल्पना

  १.२.४ एकत्त्ववाद

१.३ उपनिषदांचे तत्त्वज्ञान

  १.३.१ आत्मविषयक विचार

  १.३.२ उपनिषदातील ब्रम्ह संकल्पना

  १.३.३ उपनिषदातील जगतविचार

१.४ भगवद्गीता

१.५ भारतीय दर्शने

  १.५.१ वैदिक दर्शने

  १.५.२ अवैदिक दर्शने

  १.५.३ षड्दर्शनांची सामान्य माहिती

  १.५.४ भारतीय तत्त्वज्ञानाची सामान्य वैशिष्ट्ये

१.६ सारांश

१.७ विद्यापीठीय प्रश्न


munotes.in

## १.० उद्दिष्ट्ये

१. तत्त्वज्ञान विषय समजून घेता एईल.

२. भारतीय तत्त्वज्ञानाची तोंडओळख होईल

३. वैदीक व उपनिषदीय तत्तवज्ञाचा परिचय होईल.

४. भारतीय दर्शने अभ्यासता येतील.

५. वेदवांङ:मयाविषयी थोडक्यात माहिती करून घेतील.

## १.१ प्रस्तावना

जैविकदृष्ट्या मनुष्य हा पण एक प्राणी आहे. पण तो बुद्धिमान प्राणी आहे. विचार करणे, चिंतन करणे, प्रश्न उपस्थित करणे ही बुद्धीची कार्ये होत. म्हणूनच तो जेव्हा जगाकडे जगातील नानाविध घटनांकडे, वस्तूंकडे, भव्यतेकडे, सौंदर्याकडे पाहतो तेव्हा आपसूकच त्याच्या मनात जगाबद्दल मूलभूत प्रश्न उभे राहतात. या प्रश्नांचा तो मागोवा घेतो, त्याला वाटणारी जिज्ञासा व कुतुहूल यामधून तो बौद्धिकदृष्ट्या अस्वस्थ होतो आणि या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा तो प्रयत्न करतो. प्रयत्नांनी त्याला जे हाती लागते ते त्याचे तत्त्वज्ञान होय. तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वाचे ज्ञान. हे सारे जे दृश्य - अदृश्य, ज्ञात - अज्ञात विश्व आहे त्याला तत् म्हणतात. तर त्याच्या सारास 'त्व' असे म्हणतात. दोन्ही मिळून बनते 'तत्त्व' आणि या तत्त्वाचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान.

तत्त्वज्ञान केव्हा अस्तित्वात आले? कुठे अस्तित्वात आले? असे प्रश्न उभे राहणे साहजिकच आहे. याच्या उत्तरादाखल असे म्हणता येईल जेव्हापासून मानवजात आहे तेव्हापासून तत्त्वज्ञान आहे आणि जिथे कुठे माणूस आहे तिथे ते अस्तित्वात आले. फरक काय तो फक्त त्याच्या स्वरूपाचा. कदाचित, सुरुवातीचे तत्त्वज्ञान थोडे अप्रगत अवस्थेतील असेलही, पण तत्त्वज्ञान नाही असा काळ कल्पिता येत नाही.

काळाच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास प्राचीन, मध्ययुगीन, समकालीन आणि आधुनिक असे तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण करता येते. तर स्थळाच्या दृष्टीने पाहता पौर्वात्य तत्त्वज्ञान (Eastern Philosophy), पाश्चिमात्य तत्त्वज्ञान (Western Philosophy) तसेच भारतीय तत्त्वज्ञान, ग्रीक तत्त्वज्ञान वगैरे असे तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण करता येते.

या प्रकरणात आपण भारतीय तत्त्वज्ञान अर्थात प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करणार आहोत. सुरुवातीच्या काळातील तत्त्वज्ञान हे लिखित स्वरूपात नव्हते. कारण तेव्हा लेखनकलाच अस्तित्वात नव्हती. ते होते ऐकीव स्वरूपात. पिढी दर पिढी मौखीकरित्या पुढे पुढे जात राहिले. यातील काही तत्त्वज्ञान काळाच्या प्रवाहात गहाळ झाली असण्याची शक्यताही नाकारता येत नाही किंवा जे उपलब्ध आहे ते ही पुर्णांशाने आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. पण तत्त्वज्ञानाचा जो काही भाग मानवजातीला ज्ञात झाला नंतर तो लिखित स्वरूपात आला. त्याचाच आपण अभ्यास करणार आहोत. प्राचीन काळापासून आजतागायत भारतात जे तत्त्वचिंतन झाले त्याचा समावेश भारतीय तत्त्वज्ञानात होतो. भारतीय तत्त्वज्ञान इंग्रजीत Indian Philosophy या नावाने ओळखले जाते.

तत्त्वज्ञानास भारतामध्ये अन्य शब्दांनी सुध्दा संबोधले जाते. जसे अन्विक्षिकी, दर्शन व पराविद्या.

### १) अन्विक्षिकी:

न्यायसूत्र या गौतमऋषींनी लिहिलेल्या ग्रंथामध्ये 'आन्वीक्षिकी' हा शब्द तत्त्वज्ञानासाठी वापरला आहे. ज्ञानाकडे नेणारे तत्त्व असा त्याचा अर्थ होतो. न्यायदर्शनाने प्रमाणमीमांसेवर म्हणजेच ज्ञानमीमांसेवर भर दिला आहे. ज्ञानमीमांसा ही तत्त्वज्ञानाची महत्वपूर्ण शाखा

आहे, ज्यामध्ये ज्ञानाची साधने, ज्ञानाची यथार्थता – अयथार्थता, भ्रम आदींची चर्चा केली जाते. न्यायदर्शनाच्या मते तत्त्वज्ञानासाठी ज्ञानमीमांसा आवश्यक आहे.

**२) दर्शन:**

हा संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ स्थूल मानाने 'पाहणे' असा होतो. पण केवळ 'पाहणे' म्हणजे दर्शन नव्हे तर विशिष्ट दृष्टीने पाहणे, येथे अभिप्रेत आहे. व्युत्पत्तिशास्त्रानुसार (Etimologically)दर्शन शब्द 'दृश' या धातूपासून बनला आहे. 'दृश्यते अनेन इति दर्शनम' ज्याद्वारे पाहिले जाते व जे पाहिले जाते ते 'दर्शन'. पाहणे हे फक्त वस्तूच्या बाह्यस्वरूपाशी संबंधित आहे तर दर्शनात वस्तूचे मूळ स्वरूप जाणणे, तिचे तत्त्व जाणणे अपेक्षित आहे. यासाठी केवळ डोळे नाही तर सूक्ष्म दृष्टीची आवश्यकता असते. तत्त्वदर्शन असाही शब्दप्रयोग केला जातो, ज्याचा अर्थ तत्त्वाचे दर्शन असा होतो. ज्याला तत्त्वदर्शन झाले त्यास 'द्रष्टा' असे म्हणतात. महावीर, बुद्ध, गौतम, कपिल आदी द्रष्टे होत, कारण त्यांना तत्त्वाचे दर्शन झाले अशी मान्यता आहे. हे झालेले दर्शन त्यांच्या अनुयायांनी शब्दबद्ध केले व अशा रीतीने भारतात विविध दर्शने अस्तित्वात आली.

**३) पराविद्या:**

उपनिषदांनी ज्ञानाचे वर्गीकरण दोन प्रकारांनी केले आहे. भौतिक ज्ञान व अभौतिक ज्ञान वा अतिभौतिक ज्ञान. भौतिक ज्ञानास अपराविद्या म्हणतात. हे भौतिक जगाविषयीचे ज्ञान आहे. जे निम्नप्रतीचे मानले जाते. हे ज्ञान भौतिक जगाप्रमाणेच बदलणारे असते. अभौतिक वा अतिभौतिक ज्ञान नित्यस्वरूपाचे असते कारण जे अभौतिक असते ते अक्षर व नित्य असते. अशा ज्ञानास पराविद्या असे म्हणतात. तत्त्वज्ञानात अतिभौतिकि (Metaphysics) चा विचार येतो म्हणून त्यास 'पराविद्या' असे म्हणतात.

पाश्चात्य परंपरेत तत्त्वज्ञानास (Philosophy) असे म्हणतात.

## १.२ भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रारंभ

आपण अगोदरच पाहिले आहे कि तत्त्वज्ञानाची सुरुवात मनुष्याच्या अस्तित्वासोबतच झाली. भारतीय तत्त्वज्ञानाबाबतही हे लागू होते. परंतु तरीही तत्त्वज्ञानाचा कालिक दृष्ट्या अभ्यास करत असतांना उपनिषदपूर्व कालीन तत्त्वज्ञानापासून भारतीय तत्त्वज्ञानाची सुरुवात केली जाते. अर्थात उपनिषदपूर्व काळाचा विचार करण्याअगोदर उपनिषद काय आहे, हे समजणे क्रमप्राप्त ठरते.

उपनिषद हे वेद या प्राचीन भारतीय ग्रंथाचा अंत्य भाग आहे. म्हणून त्यास वेदांत असेही म्हणतात. मग वेद काय आहे? हा प्रश्न साहजिकच. अतिप्राचीन भारतीय ग्रंथ आहेत वेद. लेखनकलाही अवगत नव्हती त्याकाळातील. वेदांचा निश्चित असा कालखंड सांगता येत नाही आणि तसे सांगायला ते एका विशिष्ट काळात निर्माणही झालेले नाही.

वेदांचा कोणी एक असा कर्ताही नाही. खरतर वेद हे प्राचीन असा ज्ञानसंग्रह आहेत. वेद हा शब्द 'विद' या धातूपासून बनलेला आहे. विद या धातूचा अर्थ जाणणे असा होतो. यावरूनच वेद म्हणजे ज्ञान असा अर्थ करता येतो. ज्ञान म्हणून जे जे काही येते त्या सर्वांचा समावेश

वेदात होतो. सामान्यतः असा समज आहे कि ऋषींनी वेद रचले आहेत; पण या ऋषींची नावे वेदकर्ते म्हणून नाहीत. ही त्यांची प्रसिद्धी पराङमुखता आहे. वैदिकऋषी प्रसिद्धी लोलुप नव्हते म्हणूनही कदाचित वेदांचे रचयिते माहित नसावेत. वैदिक मंत्रांची रचना ऋषींनी स्वतः केलेली नसून ईश्वराकडून त्यांना ते प्राप्त झाले, अशी वैदिकांची धारणा आहे. ईश्वरवाणीचे श्रवणातून वेद निर्माण झाल्याने त्यांना 'श्रुती' असेही म्हणतात. त्याचमुळे ऋषींना मंत्रकर्ता नव्हे तर मंत्रद्रष्टा म्हणतात.

वेदांचे चार विभाग आहेत:

१) संहिता (मंत्र)

२) ब्राह्मणे

३) आरण्यके

४) उपनिषद

काळाच्या दृष्टीने सुद्धा हाच म्हणजे संहिता वा मंत्रकाल, ब्राह्मणकाल, आरण्यकाल आणि उपनिषद्‌काल अनुक्रम दिसून येतो.

वेदांचे अभ्यासविषयाच्या दृष्टीने चार प्रकार केलेले आहेत:

**१) ऋग्वेद:** ऋग्वेदसंहिता स्तोत्रमय सूक्तांचा संग्रह होय. ही संहिता सर्वात प्राचीन आहे. सुक्ते बहुतांशी देव स्तुतीपर रचलेली आहेत.

**२) यजुर्वेद:** यामध्ये ईश्वर उपासना कशी करावी याची माहिती आहे. 'यजनाविषयीचा वेद म्हणजे यजुर्वेद होय.' असे प्रा. पां. दा. चौधरी म्हणतात. यामध्ये यज्ञकर्मविधी समजावला आहे. ज्यात यज्ञकर्माला विशेष महत्त्व प्रदान करण्यात आले आहे.

**३) सामवेद:** सामवेद गायनासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय संगीताचा उगम सामवेदातून झाला आहे, असे म्हटले जाते. भगवद्गीतेमध्ये ‘वेदानाम सामावेदोऽस्मि’ म्हणजे वेदांमध्ये सामवेद हा माझी (ईश्वराची) विभूती आहे असे म्हटले आहे. यातून सामवेदाचे महत्त्व अधोरेखित होते.

**४) अथर्ववेद:** या संहितेचे मूळ नाव 'अथर्वांगिरस' असे होते. या वेदामध्ये कामनापूर्ती, अनिष्ट शांती तसेच शत्रूला पीडा देण्याचे उपाय सांगितले आहेत. त्यामुळे या संहितेस विशेष श्रेष्ठ वा पवित्र मानली जात नाही पण यामध्ये अध्यात्मविषयक भाग ही आहे.

### १.२.१ वैदिकांचे विश्वशाश्त्र:

प्रा. पी. डी. चौधरिंच्या मते, वैदिक वांगड.मयाचे जरी आपण संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद या चार प्रकारांचा समावेश करीत असलो तरी व्यवहारात वेद हा शब्द संहिता विभागाबाबतच वापरला जातो. संहिता वा मंत्रभागात वेदांचे जगाबद्दलचे विचार दिसून येतात. यालाच उपनिषदपूर्व तत्त्वज्ञान वा वेदकालीन तत्त्वज्ञान असे संबोधतात. अर्थातच हे तत्त्वज्ञान प्रारंभीचे असल्याने सामान्य स्वरूपाचे प्रतीत होते.

वेदकालीन म्हणण्यापेक्षा उपनिषदपूर्व तत्त्वज्ञान म्हणणे गोंधळ निर्माण न करणारे, समजण्याच्या दृष्टीने अधिक सोयीचे ठरेल.

उपनिषदपूर्वकालीन तत्त्वविचार हा तत्कालीनांचा विश्वाकडे बघण्याचा सामान्य दृष्टिकोन. भौतिकदृष्ट्या अधिक प्रगत नसल्याने याकाळातील मानवजातीचा निसर्गाशी अधिक संबंध दिसून येतो. निसर्गातील घटक आणि घटनांचा परिणाम त्यांच्या जीवनावर अधिक होत असे. निसर्गाची भव्यता, सौंदर्य, कला, शक्ती, क्रौर्य या सर्वांचा जवळून परिचय झाल्याने त्यांच्या मनात निसर्गाबद्दल कुतुहूल, जिज्ञासा आणि भीती असा संमिश्र भाव निर्माण होत असे. निसर्गातील घटकांमध्ये विधायक तसेच विध्वंसक कार्य करण्याची क्षमता आहे, याची जाणीव त्यांना झाली. मानवी अपेक्षेला धरूनच मग त्यांनी या नैसर्गिक शक्ती आपणास हानिकारक न ठरता लाभप्रद ठराव्यात असे वाटू लागले, ते साहजिकच. या शक्तीनांच त्यांनी नंतर 'देवता' असे नाव दिले. अनेक घटकांनी मिळून निसर्ग बनतो म्हणून या शक्ती अर्थात अनेक देवता आहेत असे त्यांनी मानले. यातूनच वेदकालीन अनेकदेवतावाद/ बहुदेवतावाद निर्माण झाला.

या देवतांची मग भीतीतून अपेक्षेतून पूजा सुरु झाली. या आम्हास अपायकारक न ठरत उपकारक ठराव्यात हीच त्यांची अपेक्षा.

अग्नी, वायू, जल, सूर्य, इत्यादी निसर्गशक्ती म्हणजेच या देवता. यांमध्ये दोन्हीही, विधायक व विध्वंसक शक्ती असतात. जसे कि अग्नीमुळे उब मिळते पण तो दाहकारक पण आहे. पाण्याने तहान भागते पण पुराचे पाणी माणसासहित सर्व काही वाहून नेते. वायूमुळे गारवा, सुखदपणा अनुभवास येतो पण हाच वायू जेव्हा वादळात रूपांतरित होतो, तेव्हा सर्वच उध्वस्त करून टाकतो. या देवतांनी आपणास सहाय्य्य करावे, आपले नुकसान करू नये म्हणून स्तवने चालू झाली. या देवतांची प्रार्थना व स्तुती करण्यास्तव सूक्ते निर्माण झाली. वैदिकांनी या देवतांवर मानवी गुणांचे आरोपण केले, म्हणजे मानवासारखेच गुण यांच्यामध्ये आहेत असे मानले. असे असूनही या देवतांना मानवासारखे मूर्त रूप मात्र दिले नाही. त्यांना निसर्गरूपच ठेवले. या देवता संख्येने अनेक आहेत तरी काही देवता अधिक महत्त्वाच्या मानल्या जात. जसे - १) अग्निदेवता, २) वरुणदेवता ३) इंद्रदेवता

या देवतांचा उल्लेख ऋग्वेदात आढळून येतो. शौर्य, शक्ती व न्याय याची देवता म्हणजे इंद्रदेवता. ही त्यांची प्रधान देवता असून तिच्या स्तवनार्थ २५० सूक्ते दिसून येतात. इंद्रामध्ये कोप, सूडभावना, अभिमान, सोमरस पीणे आदी नकारात्मक शक्ती व गुण ही आहेत. वरूण देवता मात्र पवित्र व मांगल्यपूर्ण अशी वर्णिली आहे. नैतिक सद्गुणांचे रक्षण व विकास ही देवता करते. वरूण सर्वज्ञ असून त्याला मानवी मनातील बरेंवाईटपणा लगेच समजतो. प्रेमळ, दयावान व औदार्य या तिच्या गुणांचा उल्लेख आढळतो.

मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारी देवता म्हणजे अग्निदेवता. अग्निदेवतेपासूनच ऋग्वेदाचा प्रारंभ होतो. यातून तिची महत्ता लक्षात येते. अग्नीला 'वैश्वानर' म्हणजे विश्वातील सर्व मानवांचा स्नेही असे म्हणतात.

याप्रकारे अनेक देवता मानल्याने वैदिकांना बहुदेवतावादी (polytheistic) म्हणतात. या अनेक देवता मानत असूनही जेव्हा त्यांच्या स्तुतीपर जी सूक्ते रचली गेली, तेव्हा त्यामध्ये

या सर्वच देवतांचे वर्णन समान विशेषणांनी केलेले आढळते. ज्याचा ज्या देवतेकडे कल आहे त्याने त्या देवतेला प्रधान व इतर देवतांना गौण मानून तिची उपासना करावी असा प्रघात होता. यामध्ये उपासना स्वातंत्र व ऋचिभिन्नता या दोन गोष्टी दिसून येतात. ऋचिभिन्नता हे मानसशास्त्रीय सत्य आहे. पण त्यानुसार उपासना स्वातंत्र्य देणे हे उदारमतावादाचे द्योतक आहे. म्हणूनच मॅक्समुल्लर याला बहुदेवतावादाऐवजी श्रेष्ठदेवतावाद असे नाव देतो. (Polytheism - Henotheism) असे पी. डी. चौधरी म्हणतात.

### १.२.२ एकेश्वरवाद:

या बहुदेवतावादाकडून वैदिकांनी एकेश्वरवादाकडे प्रयाण केले. तत्त्वज्ञानाचे स्वरूप प्रवाही असल्याने ते एका विचारावर न थांबता उत्तरोत्तर बदलत जाते. याचे कारण मानवाची नित्यनूतन कल्पना करण्याची शक्ती होय. या सर्व देवतांकडे शक्ती आली कुठून? हा मूलभूत प्रश्न निर्माण होणे साहजिकच होते. त्यातूनच या सर्वांना आधारभूत असणारी कुणीतरी एक श्रेष्ठ शक्ती असावी अशी कल्पना, असा विचार पुढे आला. ही एकमेव अद्वितीय परमसत्ता (Ultimate Reality) होय. तिच्यातून सर्व देवता निर्माण झाल्या. यालाच ईश्वर असे संबोधल्या जाऊ लागले. हा ईश्वर एकच असल्याने या मतास एकेश्वरवाद (Monotheism)असे म्हणतात. ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तांत याचा उल्लेख सापडतो. हा एक ईश्वर अनेक देवतांवर नियंत्रण ठेवतो. असा विचार आहे. हा ईश्वर विश्वान्तर्यामी आहे. परंतु तो विश्वव्यापी असूनही विश्वाच्या बाहेरही शिल्लक उरला आहे. अत्यतिष्ठ दशांगुलम्| वैदिकांनी सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही प्रकारचा ईश्वर स्वीकारला आहे.

### १.२.३ ऋत संकल्पना:

एकेश्वराचे अनेक देवतांवर नियंत्रण आहे. त्याचबरोबर हे विश्वसुद्धा नियंत्रित, सुसंबद्ध व व्यवस्थित असे आहे. विश्वाचे निरीक्षण केले असता त्यात व्यवस्था, नियम आढळून येते. जसे कि ठराविक काळाने येणारे दिवस-रात्र, उन्हाळा, पावसाळा हिवाळा वगैरे ऋतू. वनस्पती व प्राणी जीवनातील रचनात्मकता वगैरे.

या सर्वांचे नियमन करणारे तत्त्व आहे 'ऋ + त'. मुळात ऋतचा अर्थच नियमांची एकरूपता असा केला आहे. भौतिक जगात ज्याप्रमाणे नियमबद्धता, एकरूपता आहे. त्याचप्रमाणे नैतिक जगतात पण एकरूपता आहे. ‘ऋत’ तत्त्व नैतिक जीवनसुद्धा नियमित करते. ऋतामुळे जीवांना कर्मानुसार फळ प्राप्त होते. वरूण हि ऋताची सहाय्यक देवता होय. त्याला ‘ऋतस्य गोपा....’ म्हणजे ऋताचा रक्षक म्हणतात. ऋत संकल्पना वैदिकांच्या आध्यात्मिक प्रगल्भतेचे द्योतक आहे.

### १.२.४ एकतत्त्ववाद:

एकेश्वरवादाकडून वैदिक एकत्ववादाकडे आलेले दिसतात. एकेश्वरवाद व एकतत्त्ववादात फरक आहे. एकेश्वरवाद सर्वोच्च उपास्य ईश्वराची धारणा असून एकतत्त्ववादाचा संबंध तत्त्वचिंतनाशी आहे. उपनिषदांमध्ये तर हे स्पष्टपणे दिसून येते, पण याची बीज मात्र संहितेत सापडतात. हे एकतत्त्व अद्वैत परमतत्त्व आहे. पुरुषसुक्तात व नासदिय सुक्तात याचा उल्लेख सापडतो.

## १.३ उपनिषदांचे तत्त्वज्ञान

उपनिषद तत्त्वज्ञानप्रधान आहेत. संहितेतील विचार वेदविचार मानले जातात. उपनिषदे वेदांचा भाग असूनही त्यातील तत्त्वज्ञान उपनिषदीय तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते, वैदिक तत्त्वज्ञान म्हणून नव्हे. कालक्रमानुसार उपनिषदे वेदांच्या अंती येतात म्हणून उपनिषदांना वेदान्त असेही म्हणतात. तर उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाला वेदान्त तत्त्वज्ञान असे म्हणतात. ब्राह्मणे कर्मकांडप्रधान आहेत. ऐहिक सुखसमृद्धीचा उपाय त्यात सांगितला आहे. पण केवळ ऐहिक सुखप्राप्ती हे मानवी जीवनाचे परमध्येय होऊ शकत नाही. तर पारलौकिक तत्त्व, अंतिम तत्त्व जाणून घेणे व परमानंद प्राप्ती हेच जीवनाचे परमसाध्य आहे. यापेक्षा मोठे ध्येय असू शकत नाही. वेदांत दर्शन हे वेदान्त तत्त्वज्ञान वा उपनिषदीय तत्त्वज्ञानावर आधारित आहेत.

उपनिषदे भारतीय तत्त्वज्ञानातील प्रसिद्ध अशा प्रस्थानत्रयींपैकी एक आहेत. उपनिषदांना वेदांचा शिरपेच म्हणता येईल. कारण त्यांनी मानवी जीवनाला परमोच्च असे ध्येयदर्शन दिले आहे. तत्त्वचिंतन ही खरीतर मानवी बुद्धीची झेप आहे. बुद्धिच्याही पलिकडे असणाऱ्या तत्त्वाचा विचार त्यात येतो. मानवी जीवनाच्या कक्षा त्यातून रुंदावल्या जातात, असे चिंतन उपनिषदांत सापडते म्हणून ते महत्वपूर्ण आहेत.

उपनिषद संख्येने अनेक आहेत. परंतु साधारणतः १३ उपनिषद महत्वपूर्ण मानले जातात. ईषोपनिषद, केनोपनिषद, कठौपनिषद, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, तैत्तिरिय, ऐतरेय, छांदोग्य आणि बृहदारण्यक हे प्राचीन उपनिषदे आहेत आद्यशंकराचार्यांनी यावर भाष्य लिहिले आहे. कौषीतकी, श्वेताश्वतर आणि मैत्रायणी उपनिषदसुद्धा प्राचीन मानले जातात.

उपनिषदांचे महत्त्व स्पष्ट करताना शोपनहॉवर म्हणतो, ‘In the whole world there is no study so beneficial and so elvating as that of the upnishad. It has been the solace of my life, it will be the solace of my death. (History of Indian philosophy – vol IP 40 by Dr. Dasgupta.)

उपनिषद हा शब्द उप + नि + सद् असा बनला आहे. सद् म्हणजे 'बसणे उप म्हणजे जवळ. गुरूजवळ बसून ज्ञान ग्रहण करणे म्हणजे उपनिषद ज्ञानदानास योग्य शिष्य निवडूनच गुरु त्यास शिकवत असत. उपनिषदातील ज्ञान वास्तव गूढ मानले जाई.

### १.३.१ आत्मविषयक विचार:

अनेक उपनिषदे असूनही सर्वच उपनिषदात आत्म्याच्या स्वरूपाबद्दल चर्चा येते. आत्मज्ञान, आत्मस्वरूप व आत्मज्ञानाचा मार्ग याचा उहापोह पहायला मिळतो.

उपनिषदातील आत्मा सर्वव्यापी, सर्वांतर्यामी असा आहे. आत्मस्वरूपाचे शब्दांद्वारे वर्णन कठीण असले तरी त्यास सर्वकर्म, सर्वकाम, सर्वगंध ही विशेषणे वापरली आहेत. आत्मा काय आहे हे सांगण्याऐवजी तो काय नाही, याचे वर्णन करण्यात आले आहे. कठोपनिषदात आत्मा स्पर्श, रूप, रस, गंध यापैकी नाही असे म्हटले आहे. म्हणजेच आत्मा अभौतिक आहे. यालाच आध्यात्मिक असेही म्हणतात. बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे की आत्मा पंचज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय व मनाहून भिन्न आहे. वाणी त्याला व्यक्त करू शकत नाही

पण वाणीला अभिव्यक्ती त्यामुळेच येते. मनाने त्याची कल्पना करता येत नाही परंतु मनाची कल्पनाशक्ती त्यामुळेच असते, डोळे त्याला पाहू शकत नाही पण पाहण्याची शक्ती डोळ्यांना त्यामुळेच मिळते. कान त्याला ऐकू शकत नाही पण ऐकण्याची शक्ती कानांना त्याद्वारेच प्राप्त होते.

प्राणांचा श्वासोच्छवास त्याद्वारेच चालतो. तो सर्वेंद्रियाचे अधिष्ठान आहे.

कठोपनिषदात आत्म्याचे वर्णन करताना म्हटले आहे तो सूक्ष्मातिसूक्ष्म व महानाहून महान 'अणोरणियान महतो महियान' असा आहे. आत्मचेतनाच्या चार अवस्था सांगितल्या असून त्या आहेत, जागृतावस्था, स्वप्नावस्था, सुषूप्तीवस्था व तुरीय अवस्था. अंतिम अवस्था 'तुरीय' अवस्था ही शुद्ध चेतनेची अवस्था आहे. यास चेतन अचेतन असे संबोधता येत नाही. सुषूप्ती अवस्थेत आत्मा आनंदोपभोग घेतो बाह्य व आंतरिक विषयाच्या बाबतीत उदासीन असतो. स्वप्नावस्थेत आत्मा सूक्ष्म विषयांचा उपभोग घेतो. तर जागृत या प्रथमावस्थेत बाह्य जगाचे ज्ञान तिला होत असते.

**पंचकोषसिद्धान्त-** तैत्तरीय उपनिषदात आत्म्यासंबंधी पंचकोशाचे वर्णन आढळते. कोष म्हणजे आवरण आत्मा या पाच आवरणांनी वेष्ठित आहे:

**१) अन्नमयकोष -** स्थूल शरीराला अन्नमयकोष म्हणतात.

**२) प्राणमय कोष -** अन्नमयकोशामध्ये प्राणमय कोष असतो. हा प्राणशक्तींनी युक्त असतो.

**३) मनोमय कोष -** प्राणमय कोशात मनोमय कोष असतो. हा मनावर आधारित असून यामध्ये इच्छा आकांक्षा असतात.

**४) विज्ञानमय कोष -** मनोमय कोशांतर्गत विज्ञानमय कोष असतो. हा बुध्दिआश्रीत आहे. यामध्ये ज्ञाता - ज्ञेय भेद करणारे ज्ञान असते.

**५) आनंदमयकोष -** विज्ञानमय कोशांतर्गत आनंदमयकोष असतो, यात आनंदाचा वास असतो हा लौकिक आनंद असतो म्हणून आनंदमयकोष सुद्धा विकारवानच ठरतो. म्हणून त्याला अविकारी आत्मा म्हणता येत नाही. आत्मा या सर्व कोषातून भिन्न असा आहे. कठोपनिषदात म्हटले आहे; ' इंद्रियांहून मन श्रेष्ठ, मनातून बुद्धी श्रेष्ठ व बुद्धीहूनही महान असा आत्मा आहे. तस पाहायला गेले तर आत्म्याचे निर्वचन होत नाही. म्हणजे त्याचे वर्णन करता येत नाही. तो कसा आहे हे सांगण्यापेक्षा तो कसा नाही हेच सांगितले जाते. म्हणून त्याचे वर्णन नेती-नेती ( तो असा नाही असा नाही ) असे केले जाते. तरीही कमीत कमी शब्दहानी करत आत्म्याचे वर्णन उपनिषदे करतात. सच्चिदानंद या पदाने. आत्मा कसा आहे तर तो सत + चित + आनंद म्हणजेच शाश्वत, चेतन व आनंदस्वरूप असा आहे. आत्म्याचे हे स्वरूप लक्षण आहे.

उपनिषदात आत्मैक्यावर भर दिसतो. सर्वांच्या ठायी एकच आत्मतत्त्व आहे. कठोपनिषदात म्हटले आहे, अग्नी ज्याप्रमाणे वेगवेगळ्या पदार्थांचे दहन करतो व दहन होत असणाऱ्या पदार्थांचे रूप घेतो त्याचप्रमाणे सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी असणारा आत्मा अनेक रूपे घेतो. उपनिषदातील हा आत्मैक्याचा विचार सृष्टीत ऐक्य निर्माण करू शकतो. हा विचार

समाजात रुजला तर समाजात कुठल्याही प्रकारचा भेद राहणार नाही. मनुष्यच काय पण मनुष्येतर प्राणी व वनस्पतिसृष्टीकडे माणूस पूजनीयतेच्या, गौरवाच्या दृष्टीने पाहिल. 'आत्मज्ञान' हे उपनिषदांच्या मते सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. आत्मज्ञानी व्यक्ती सर्वज्ञ असते. जाणण्यासारखे काही शिल्लक उरत नाही. आत्मज्ञान, आत्मानुभूती, मोक्ष या एकाच अर्थाच्या संकल्पना असून उपनिषदानुसार हेच जीवनाचे परमध्येय आहे. 'अहंब्रह्मास्मि' मीच (आत्मा) ब्रह्म आहे, ही अवस्था, अनुभूती सर्वश्रेष्ठ अशी मानली गेली आहे.

ब्रह्म व आत्मा यांच्या एकत्वाचा उल्लेख छांदोग्य उपनिषदात आढळतो. आरुणी नामक ऋषी श्र्वेतकेतूला म्हणतात, "तत् त्वम असी" 'ते तू आहेस' म्हणजे ते (ब्रह्म), तू (आत्मा) आहेस. थोडक्यात आत्मा म्हणजेच ब्रह्म. आत्म्याच्या संदर्भात उपनिषदांत महावाक्य आढळतात. तेन त्वम असी, तस्य त्वम असी, तत्त्वमसि म्हणजे अनुक्रमे त्याचा तू आहेस, त्याच्यामुळे तू आहेस व शेवटी तोच तू आहेस. (ऐतदात्म्यमिदं सर्व, तत्सत्व, स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो)

### १.३.२ उपनिषदातील ब्रह्म संकल्पना:

उपनिषदातील अंतिम तत्त्व म्हणजे 'ब्रह्म' होय. अर्थात हे ब्रह्म एक तत्त्व आहे. ब्रह्म, विष्णू, महेश या पौराणिक संकल्पनेतील हे ब्रह्म नव्हे. उपनिषदांनी 'ब्रह्म' हे एकमेव अंतिम तत्त्व मानले आहे. ते सत्य, ज्ञान व अनंत स्वरूप आहे. ते सर्वव्यापी, शुद्ध, चेतन व अंतर्यामी आहे. ब्रह्मातूनच जगाची उत्पत्ती होते व अंती जग त्यातच विलीन होते. असे तैत्तरिय उपनिषदात म्हटले आहे. केनोपनिषदात म्हटले आहे कि, जगातील सर्व शक्ती हि ब्रह्माची आंशिक अभिव्यक्ती आहे. उदा. भौतिक आणि मानसिक शक्तीचे ते अधिष्ठान आहे.

'ब्रह्म' स्वरूप - उपनिषदात ब्रह्माचे दोन स्वरूप सांगितली आहेत. १) परब्रह्म २)अपरब्रह्म

**परब्रह्म:**

याचे वर्णन करता येत नाही. ते निर्गुण आहे. केवळ निषेधानेच त्याचे वर्णन होते. जसे कि, निर्गुण, निर्विशेष, निरंजन, निरुपाधी इत्यादी. बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे कि, ब्रह्म स्थूल नाही, सूक्ष्म नाही, ऱ्हस्व नाही तसेच दीर्घही नाही, रक्त नाही, बिंब नाही, सावली नाही कि अंधार नाही, वायू नाही, आकाश नाही, रस, प्राण, मुख नाही. ते आत आहे ना बाहेर आहे, ते कशाला खात नाही व त्यालाही काही खात नाही. (३/१८) श्रुतींनी मिळून निर्गुण ब्रह्मास अनिर्वचनीय म्हटले असून त्याचे वर्णन 'नेति नेति' असे निषेधात्मक केले आहे. परंतु अशा पद्धतीने ब्रह्म हे नाही, ते नाही याचा अर्थ ते काहीच नाही असा होत नाही, तर 'ब्रह्मच सर्व काही आहे' असा होतो. येथे अभावाचा अर्थ पूर्ण भाव असा घ्यावा लागतो.

ब्रह्म ज्ञान हे मन, बुद्धी इंद्रियांद्वारे होत नाही. परंतु असे असूनही ते अज्ञेय नाही. ब्रह्म हा अनुभवाचा नाही अनुभूतीचा विषय आहे.

**सगुण ब्रह्म (अपरब्रह्म):**

ईश्वरास अपरब्रह्म असेही म्हटले आहे. हे सगुण ब्रह्म आहे. याचे भावात्मक वर्णन उपनिषदात आढळते. हा ईश्वर सर्वांचा आधार सर्वज्ञ सृष्टिकर्ता असा आहे. सगुण-निर्गुणात तत्त्वतः भेद

नसून स्वरूपात फरक आहे. ईश्वर सृष्टिकर्ता आहे या संदर्भात मुण्डकोपनिषदात कोळी व जाळे याचे रूपक दिले आहे. कोळी ज्याप्रमाणे स्वतःमधूनच जाळे तयार करतो व ते जाळे स्वतःच खाऊन टाकतो. त्याचप्रमाणे ईश्वर स्वत:मधून विश्वाची निर्मिती करतो व शेवटी ते स्वतःमध्येच विलीन करून घेतो. अशाप्रकारे सगुण ब्रह्म हे निर्वचनिय म्हणजे वर्णन करण्याजोगे असे आहे, असे उपनिषदात म्हटले आहे. ब्रह्म या शब्दाचा अर्थ प्रार्थना भक्ती असा होतो. ब्रह्म हा शब्द बृद्द धातूपासून निर्माण झाला आहे. बृद्द म्हणजे वाढणे व विस्तारणे यानुसार "स्वतःला स्वयंस्फूर्तपणे विश्वरूपाने अभिव्यक्त करणारे मूलतत्त्व व शक्ती म्हणजे ब्रह्म होय." अशी व्याख्या प्रा. श्रीनिवास दीक्षित करतात. तैत्तरीय उपनिषदात ब्रह्माला सत्य ज्ञान म्हणजे नित्य असे म्हटले आहे.

ब्रह्माला सच्चिदानंद असे ही म्हटले आहे. सत् म्हणजे शाश्वत अस्तित्व, चित् म्हणजे चेतन, ते चैतन्यरूप आहे. म्हणजे चैतन्य हा त्याचा गुण नव्हे तर स्वरूपच आहे. चेतनत्व हे ब्रह्माचे विशेषण नसून स्वरूप आहे. चैतन्यच चैतन्याला जाणू शकते, म्हणून ब्रह्मच ब्रह्माला जाणते. म्हणून त्यास स्वसंवेद्य असे म्हणतात. आनंदरूप असे म्हणत असताना उपनिषदांना अभिप्रेत अर्थ सुख असा नाही, लौकिक आनंद असाही नाही. तर परमशांती नित्य आनंद असा आहे. ब्रह्म सत्, चित् आनंदस्वरूप असा आहे. थोडक्यात सत्, चित्, आनंद ब्रह्माची विशेषणे नसून गुण आहेत.

छांदोग्य उपनिषदात  ब्रम्हाला तज्जालान् असं म्हणजे उत्पत्ति, स्थिती, लयकार असे म्हटले आहे.

### १.३.३ उपनिषदातील जगतविचार:

जगाविषयीचे चिंतन तत्त्वचिंतनाचा महत्त्वाचा भाग आहे. वैविध्याने नटलेले सभोवतालचे जगत बुद्धिमान मानवास विचार करावयास भाग पाडते. हा विचार फार पूर्वीपासून चालू आहे. औपनिषद्कालीन ऋषी जगाच्या उत्पत्ती, स्थिती, लयासंदर्भात विचार करतात.

ब्रह्मातूनच जगउत्पत्ती झाली असून ब्रह्मातच त्याचा लय होतो असे बृहदारण्यक उपनिषद सांगते. उपनिषदामध्ये जगाला सत्य म्हटले आहे. जगताला ब्रह्माचाच विकास असे म्हटले आहे. जगतविकास क्रम उपनिषदात सांगितला आहे. यामध्ये सुरुवातीस ब्रह्मातून आकाश निर्माण झाले, आकाशातून वायू, वायूतून अग्नी, अग्नीतून जल व जलापासून पृथ्वी उत्पन्न झाली व नंतर पृथ्वीपासून औषधी, औषधीपासून अन्न, अन्नापासून अमृत पुरुष व त्यातूनच संपूर्ण सृष्टी निर्माण झाल्याचे तैत्तरीय उपनिषदात म्हटले आहे. भूमी, आप, तेज, वायू वा आकाश ही पंचमहाभूते असून प्रत्येकाचा स्वतःचा असा एक गुण मानला आहे. भूमी म्हणजे पृथ्वीचा गुण आहे गंध, आप म्हणजे जलाचा गुण आहे रस, तेज व अग्नीचा गुण आहे रूप, स्पर्श हा वायूचा गुण असून आकाशाचा गुण आहे शब्द. जगातील नानाविध पदार्थ या पंचमहाभूतांचा अविष्कार असून ही भुते ब्रह्मातून उत्पन्न झालेली आहे. म्हणजे ब्रह्म हे जगाचे अभिन्न निमित्तोपादन कारण आहे. ज्याप्रमाणे आत्मा आणि ब्रह्मात ऐक्य आहे त्याचप्रमाणे जगत हे सुद्धा ब्रह्माहून भिन्न नाही.

उपनिषदांनी जगाला कुठेही भ्रम असे म्हटलेले नाही. जग हे वास्तव सत्य आहे. त्यामध्ये ईश्वराचा वास आहे **'ईशावास्यमिदं सर्वभू'** असे ईशावास्योपनिषदात म्हटले आहे. त्यामुळेच

जग हे सुंदर आहे, मधुर आहे, त्याचा आनंद घ्यावा असा उपनिषदविचार जगाकडे मांगल्याच्या दृष्टीने पाहण्याचा दृष्टिकोन देतो. जगाकडे केवळ उपभोगाच्या नाही तर उपासनेच्या दृष्टीने पाहण्याचा डोळा देतो. सर्वांतर्यामी ईश्वर मानल्याने संपूर्ण जगाकडे पूजनीयतेच्या, आदराच्या दृष्टीने पाहण्याची सवय लागते. अर्थातच सृष्टीकडे बघण्याचा पूज्य भाव त्यातून निर्माण होतो. उपनिषदांचा जगत विचार नीतिशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

## १.४ भगवद्गीता

उपनिषदपूर्वकाल म्हणजेच वैदिक काळ व तत्कालीन तत्त्वविचारांचा अभ्यास केल्यानंतर वेदांचा अंत्यभाग असा वेदांत आपण अभ्यासला. यात प्रामुख्याने अनेक उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा समावेश आहे. उपनिषदातील तत्त्वज्ञान म्हणजे वेदांत. उपनिषदांमध्ये तत्त्वविचार विखुरलेल्या अवस्थेत पाहावयास मिळतात. उपनिषदांतील विचारांचा मेळ लावणे सर्वसामान्यांसाठी कठीण काम आहे. मुळात उपनिषदातील तत्त्वविचार जनसामान्यात म्हणावा तसा पसरलाच नाही. अशावेळी आवश्यकता होती या विखुरलेल्या तत्त्वज्ञानाला एका ठिकाणी आणून सोप्या, सुटसुटीत स्वरूपात जनसामान्यांसमोर आणण्याची ही आवश्यकता पूर्ण केली श्रीमदभगवदगीतेने. अर्थातच श्रीमदभगवद्गीता उपनिषदांतील विचारांचे सार आह. असे म्हटले जाते-

सर्वोपनिषदो गावो, दोग्धा गोपालनंदनः ।

पार्थोवत्स सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृत महत् ॥

या ठिकाणी उपनिषदांना गायीची उपमा दिली असून या गायीचे दूध म्हणजे भगवदगीता, श्रीकृष्ण हे दूध अर्जुनास (वत्स) पाजतो.

अर्जुन हा सर्वसामान्यांचा प्रतिनिधी आहे. उपनिषदातील तत्त्वविचार त्याच्या माध्यमातून श्रीकृष्णाने अखिल मानवजातीस दिला आहे. गीता उपनिषदांच्या तुलनेने सामान्य व्यक्तीकडे जास्त पोहोचली आहे. गीतेतील तत्त्वविचार येथील लोकजीवनाचा भाग झालेला पाहावयास मिळतो. गीता संतांनी, सुधारकांनी, क्रांतिकारकांनी उचललेली दिसून येते. ती जशी विद्वानांमध्ये प्रसिद्ध आहे तशीच सामान्यांची पण आवडती अशी आहे. विनोबा भावे तर गीतेला आई संबोधतात. याच गीतेची मराठी भाषेतील प्रसिद्ध टीका आहे ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी '. ज्ञानेश्वरीच्या रूपाने गीताच लोकांपर्यंत पोहचली आहे. स्वातंत्र्यासाठी माणसं तयार करण्यास्तव टिळकांनी 'गीतारहस्य' (श्रीमदभगवद्गीतारहस्य) लिहिले व गीतेचा कर्मयोग त्याद्वारे लोकांपर्यंत पोहोचवला. अर्थातच गीतेत कर्मकांड नव्हे तर कर्मयोग समजावला आहे. ज्ञानाची महत्ता आणि भक्तीची सुलभता समजावून ज्ञान, कर्म, भक्तीचा समन्वय घडवून आणला आहे. अशी ही श्रीमदभगवद्गीता महाभारत या महाकाव्याच्या भीष्मपर्वात आलेली असून कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितलेली आहे. यातून जीवन हे सुद्धा एक समर असून ते कुशलतेने लढावयास हवे अशी शिकवण मिळते. श्रीमदभगवद्गीतेच्या रूपाने तत्त्वज्ञान हा केवळ पंडितांचा चर्चेचा विषय नसून माणसाला जीवन जगण्यास मार्गदर्शन करणारा विषय आहे, याची प्रचिती येते. भगवद्गीतेने तत्त्वज्ञानाला जीवनाभिमुख बनविले आहे.

## १.५ भारतीय दर्शने

श्रीमदभगवद्गीतेनंतरचा काळ दर्शनकाळ म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये तत्त्वज्ञान दर्शन म्हणूनही ओळखले जाते. त्याचा मतितार्थ जरी एकच असला तरी व्युत्पत्तिशास्त्रानुसार या शब्दांचे अर्थ बदलतात. तत्त्वज्ञान म्हणजे 'तत्त्वाचे ज्ञान' आणि तत्त्व म्हणजे आपल्यासहीत आपल्या सभोवतालचे ज्ञात-अज्ञात विश्व, त्याचे सार. तर दर्शन हा शब्द 'दृश्य' या धातूपासून बनला आहे. 'दृश्य' म्हणजे पाहणे. परंतु हे पाहणे सामान्यतः आपण ज्याला लोकव्यवहारात 'पाहणे' असे म्हणतो ते नसून दर्शन म्हणजे जगाकडे, जीवनाकडे विशिष्ट दृष्टिकोनातून पाहणे. 'दृश्यते अनेन इति दर्शनम' अशी दर्शन शब्दाची व्याख्या केली असून त्याचा अर्थ ज्याद्वारे दिव्यदृष्टी मिळते ते दर्शन असा होतो. डॉ. बद्रीनाथ सिंह यांच्या मते भारतीय दर्शन हे पाश्चिमात्य तत्त्वज्ञानासारखे केवळ बौद्धिक व्यायाम नाही, ते जीवनाचे अंतिम ध्येय गाठण्यासाठीचा मार्गदर्शक आहे. केवळ जिज्ञासापूर्ती एवढाच त्याचा उद्देश नसून दुःखाचा उपशम करून चिरशांतीचा लाभ त्यातून होतो.

वेदोपनिषदांनंतर आलेली असल्याने 'भारतीय दर्शने' ही अर्थातच वेदांशी संबंधित अशी आहेत. हा संबंध दोन प्रकारचा आहे - वेदांना मानणारी दर्शने व वेदांना न मानणारी दर्शने. त्यातूनच भारतीय दर्शनाची वैदिक दर्शने व अवैदिक दर्शने असे वर्गीकरण करण्यात आले. महत्त्वाची अशी नऊ दर्शने मानली असून त्यापैकी सहा दर्शने ही वैदिक दर्शने आहेत तर उर्वरित अवैदिक दर्शने आहेत.

### १.५.१ वैदिक दर्शने:

वैदिक दर्शने सहा असून त्यांना षडदर्शने असेही म्हणतात. ती याप्रमाणे आहेत न्यायदर्शन, वैशेषिक दर्शन, सांख्यदर्शन, योगदर्शन, पूर्वमीमांसा व वेदांतदर्शन.

### १.५.२ अवैदिक दर्शने:

भारतीय तत्त्वज्ञानात तीन अवैदिक दर्शने आहेत. चार्वाकदर्शन, बौद्धदर्शन व जैनदर्शन.

अवैदिक दर्शनाचा आपण पुढे सविस्तर अभ्यास करणार असल्याने येथे आपण वैदिक दर्शनांची थोडक्यात माहिती जाणून घेऊया.

### १.५.३ षडदर्शनांची सामान्य माहिती:

#### १) न्यायदर्शन:

न्याय हे वैदिक दर्शनांपैकी एक असून महर्षी गौतम हे त्याचे प्रणेता आहेत. दर्शनाच्या रचयित्यास दर्शनकार म्हणतात. न्यायदर्शनाचा मुख्य ग्रंथ आहे 'न्यायसूत्रे'. या न्यायसूत्रावरच अनेक भाष्ये लिहिली गेली आहे. न्यायदर्शनाचे प्राचीन न्याय व नव्यन्याय असे दोन प्रकार पडतात. न्यायदर्शनात प्रमाणशास्त्र अथवा ज्ञानमीमांसेवर अधिक भर देण्यात आला आहे. 'न्याय' म्हणजे 'नियते अनेन इति न्याय' अर्थात जो आपणाला निकर्षापर्यंत घेऊन जातो तो. यास्तव त्यांनी ज्ञानाच्या चार प्रमाणाचा स्वीकार केला आहे. ती आहेत- १) प्रत्यक्ष २) अनुमान ३) उपमान ४) शब्दप्रमाण. न्यायदर्शनाने वैशेषिक

दर्शनातील तत्त्वमीमांसा जवळजवळ स्वीकारलेली असल्याने न्याय आणि वैशेषिक दर्शनास समानतंत्र दर्शने असे म्हणतात.

**२) वैशेषिक दर्शन:**

वैशेषिकांनी न्यायदर्शनाची ज्ञानमीमांसा स्वीकारली आहे. त्यामुळेच या दर्शनाचा उल्लेख न्याय-वैशेषिक असा जोडून केला जातो. वैशेषिक दर्शनात तत्त्वमीमांसेवर अधिक भर दिला आहे. कणाद महर्षी या दर्शनाचे प्रणेता असून या दर्शनातील अणुवाद प्रसिद्ध आहे. कणादांना प्राचीन भारतीय अणुवादाचे प्रवर्तक मानले जात असून भारतामध्ये 'अणू' चर्चा ही फार पूर्वीपासून होती याचे ते उदाहरण आहे. 'वैशेषिक सूत्रे' हा महर्षी कणादांचा ग्रंथ या दर्शनाचा प्रमाणग्रंथ होय. द्रव्याच्या अंतिम अवयवास अणू म्हणतात.अणु संख्येने अनेक मानल्याने या दर्शनास अनेकतत्त्ववादी असे म्हटले जाते. या दर्शनास 'औलुक्यदर्शन' व कणाददर्शन असेही म्हटले जाते. परंतु 'वैशेषिक' हे त्याचे नाव अतिप्राचीन असल्याने याच नावाने हे दर्शन ओळखले जाते.

पदार्थमिमांसा हे या दर्शनाचे वैशिष्ट्य असून या दर्शनाने सात पदार्थ मानले आहेत. पदार्थ म्हणजे 'पदस्थ अर्थ'. अर्थात ज्याचे नामकरण होऊ शकते ते, ज्यासंबंधी आपण बोलू शकते. वैशेषिकांच्या पदार्थांत विश्वातील सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. हे पदार्थ आहेत-

१) द्रव्य २) गुण ३) कर्म ४) सामान्य ५) विशेष ६) समवाय व अभाव

काही विद्वानांच्या मते 'अभाव' हा पदार्थ कणादांनंतर समाविष्ट करण्यात आला आहे.

**३) सांख्यदर्शन:**

सांख्य हे अतिशय महत्वपूर्ण दर्शन असून त्यास प्रधानमल्ल असे म्हणतात. भगवद्गीतेमध्ये ईश्वराच्या विभूती सांगत असतांना 'सांख्यानांकपिलो मुनी'. असे म्हणून सांख्यदर्शनकार कपिलमुनी यांस ईश्वराची विभूती म्हटले आहे. आश्चर्य हे की सांख्यदर्शनाने 'ईश्वरासिद्धये' म्हणजे ईश्वर सिद्ध होत नाही. म्हणजेच असिद्ध आहे असे म्हटले आहे. ईश्वर असिद्ध आहे याचा अर्थ तो नाही असा होत नाही. फक्त तो सिद्ध होत नाही असेच म्हटले आहे. विश्वाचा व्यवस्थापक म्हणून त्याची सिद्धी केली जाते, पण सांख्यदर्शनकारांनी मात्र उत्पत्ती प्रक्रियेत कुठेही ईश्वराची गरज भासत नाही हे दाखवून दिले आहे.

पुरुष आणि प्रकृती ही दोन मुलतत्वे त्यांनी मानली आहेत. त्यांच्या संयोगाने सत्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त अशा प्रकृतीतून उत्पत्ती कशी होते, हे त्यांनी पद्धतशीरपणे दाखवून दिले आहे. पुरुष व प्रकृती ही दोन मुलतत्वे व प्रकृतीतून उत्क्रांत झालेली महत, अहंकार आदी तेवीस तत्वे अशी एकूण पंचवीस तत्वे, त्यांनी मानली आहेत. कपिलमुनींची 'सांख्यसूत्रे' हा या दर्शनाचा मूळग्रंथ आहे पण तो उपलब्ध नाही. त्यामुळे सांख्यदर्शनाचा तत्त्वविचार समजविण्यासाठी ईश्वरकृष्णाची 'सांख्यकारिका' याचा आधार घेतला जातो. प्रत्यक्ष, अनुमान व शब्द अशी तीनच प्रमाणे या दर्शनाने स्वीकारली आहेत. सांख्यदर्शनाचा सत्कार्यवाद प्रसिद्ध आहे. त्यांच्या मते कार्य हे कारणात अगोदरच अस्तित्वात असते, विशिष्ट कारणातूनच विशिष्ट कार्याची उत्पत्ती होते.

### ४) योगदर्शन:

सांख्य आणि योग या दर्शनाची तात्विक बैठक समान आहे. सांख्य प्रमाणेच प्रकृती आणि पुरुष ही दोन मुलतत्वे योगादर्शनाने मानली आहेत. मात्र योगदर्शनाने 'ईश्वर' हे अधिकचे तत्त्व मानल्याने एकूण तत्त्वसंख्या सव्वीस झाली आहे. पतंजली हे या दर्शनाचे दर्शनकार असून 'योगसूत्रे' हा मूळग्रंथ मानला आहे. 'ईश्वर' हे तत्त्व मानल्याने यास 'सेश्वरसांख्य' असेही म्हणतात.

योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध, योगश्चित्तवृत्तिनिरोध असे पहिल्याच योगसूत्रात म्हटले आहे. हा योग साधण्यासाठी 'अष्टांगयोग' हा मार्गही त्यांनी सुचवला आहे. या अष्टांगयोगातील पहिले दोन अंग म्हणजे यम व नियम. यात योगदर्शनाचे नितिशास्त्र सामावले आहे. आसन व प्राणायामालाच आज योग समजले जाते परंतु ही योगाची अंगे असून 'योग' ही अवस्था साधावयाचे साधने आहेत. योगदर्शनामध्ये मानवाच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक, आध्यत्मिक इत्यादी बाजूंचा विचार करण्यात आला असून त्यांचे उन्नतीकरण करण्याचा मार्ग दाखविला आहे. इतर दर्शनाच्या तुलनेने हे दर्शन आज जगप्रसिद्ध झाले असून विशेषतः आरोग्य आणि ताण-तणावाचे व्यवस्थापन यासाठी त्याचा अवलंब केला जातो. २१ जून हा जागतिक योगदिन म्हणून सर्वश्रुत आहे. भारताचे प्राचीन विचारवैभव जगाणे स्वीकारले ही आपणासाठी गौरवाची बाब आहे.

### ५) पूर्वमीमांसादर्शन:

हे दर्शन पूर्णतः वेदांवर आधारित असून वेदांतील कर्मकांडाची मीमांसा या दर्शनात झाली आहे. 'मीमांसा' म्हणजे चिकित्सापूर्वक परामर्श. वेदांचा पूर्वभाग कर्मकांडात्मक असून उत्तरभाग ज्ञानकांडात्मक आहे. या दर्शनाने वेदांच्या पूर्वभागाची मीमांसा केल्याने यास पूर्वमीमांसा असे म्हणतात. येथे मात्र मीमांसा शब्दाचा अर्थ चिकित्सेपेक्षा वेदवचनांचे परिशीलन करून त्यात प्रतीत होणारा विरोधाभास दूर करणे व या वचनांचा समन्वय घडवून आणणे हे या दर्शनाचे उद्दिष्ट आहे. जैमिनी हे या दर्शनाचे प्रणेते असून 'मीमांसासूत्रे' हा मुख्य ग्रंथ होय. काही काळानंतर या दर्शनाचे भाट्टमत व प्रभाकरमत असे दोन संप्रदायात रूपांतर झाले. प्रभाकरांनी प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान व अर्थापत्ती हे पाच प्रमाण मानले असून कुमारिलभट्टाना या पाचव्यातिरिक्त अनुपलब्धी हे सहावे प्रमाण मानले आहे. या दर्शनाने वेदांना अपौरूषेय मानले आहे. सृष्टिकर्ता व वेदरचयिता असा ईश्वर त्यांनी मानलेला नसल्याने या दर्शनाची गणना निरीश्वरवादी दर्शनात होते. मात्र प्रो. मॅक्समुल्लर सारखा विद्वान या दर्शनास निरीश्वरवादी दर्शन मानत नाही. सृष्टिकर्ता न मानणे म्हणजे ईश्वरच न मानणे असा अर्थ करता येत नाही, असा त्याचा युक्तिवाद आहे. हे दर्शन अनेकतत्त्ववादी व वास्तववादी आहे. म्हणूनच त्यांनी जगाला भ्रम न ठरवता ते वास्तव म्हणून स्वीकारले आहे. मीमांसकांनी परमाणुवाद स्वीकारला आहे. पण तो न्यायवैशिष्टिकांपासून भिन्न असा आहे.

### ६) वेदान्तदर्शन:

या दर्शनास उत्तरमीमांसा असे सुद्धा म्हणतात. वेदांच्या उत्तरभागाची मीमांसा यात आलेली आहे. वेदांतील ज्ञानकांड हे वेदांच्या शेवटी येते, याचा विचार या दर्शनात झाला असल्याने

यास 'वेदांत दर्शन' असेही म्हटले जाते. वेदांत म्हणजे वेदांचा अंत्य भाग. यामध्ये उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा समावेश आहे. या दर्शनाचे आद्यप्रवर्तक आहेत बादरायण. त्यांनाच वेद्व्यास असेही म्हणतात. उपनिषदातील वाक्यांचा समन्वय घडवून आणण्यासाठी व्यासांनी ब्रह्मसूत्रांची रचना केली. यास वेदान्तसूत्रे वा शारीरिक सूत्रे असेही म्हणतात. ही ब्रह्मसूत्रे प्रसिद्ध अशा प्रस्थानत्रयीतील एक आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व भगवदगीता या तीन ग्रंथांना प्रस्थानत्रयी म्हणतात. या प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिणाऱ्यास आचार्य असे म्हणतात. हे भाष्यकार अनेक आहेत पण पाच प्रमुख आचार्यांनी जी भाष्ये लिहिली त्यावरून वेगवेगळी वेदान्तमते उदयास आली. हे आचार्य व त्यांची वेदान्तमते याप्रमाणे.

१) शंकराचार्य केवलाद्वैतवाद

२) रामानुजाचार्यांचे विशिष्टद्वैतमत

३) मध्वाचार्यांचे द्वैतमत

४) वल्लभाचार्यांचा शुद्धाद्वैतवाद

५) निंबर्काचार्यांचे द्वैताद्वैतमत वा भेदाभेदवाद

ब्रह्मसूत्रे ही संक्षिप्त स्वरूपात असून समजण्यास कठीण होती. म्हणूनच या वेगवेगळ्या भाष्यकारांनी वरील भाष्ये त्यावर लिहिली, परंतु या प्रत्येक भाष्यकाराने आपल्या मताच्या समर्थनार्थ वेदांचा संदर्भ दिला आहे. यामध्ये एक शृंखला दिसून येते.वेदांचे अर्थघटन करण्यासाठी 'ब्रह्मसूत्रे' रचिली गेली. तर ब्रह्मसूत्रातील तत्त्वविचार स्पष्ट करण्यास वेदांत दर्शने निर्माण झाली.

### १.५.४ भारतीय तत्त्वज्ञानाची सामान्य वैशिष्ट्ये:

भारतामध्ये तत्त्वविचारांमध्ये वैविध्य आढळून येते. मात्र विचार भिन्नता असून देखील विचारस्वातंत्र असल्यामुळे या ठिकाणी विविध दर्शने अस्तित्वात आली आणि टिकली. इतरांच्या विचारांचे वैचारिक खंडन करून स्वमताचे पद्धतशीरपणे मण्डन करावयाचे, मतभेद असले तरी मतभेद होऊ द्यायचे नाहीत हे येथील दर्शनाचे, दर्शनकारांचे वैशिष्ट्य. म्हणूनच तत्त्वजगतातसुद्धा भारतामध्ये विविधतेत एकता आढळून येते. हे खरंतर इथल्या तत्त्वप्रेमींचे उदात्त व व्यापक मनोवृत्तीचे दर्शन आहे.

भारतीय दर्शनाची काही सामान्य वैशिष्ट्ये आहेत :

### १) जीवनाभिमुख तत्त्वज्ञान:

भारतीय तत्त्वज्ञान पलायनवादी नाही. ते जीवनापासून प्रवृत्त करत नाही. तर जीवनातील वास्तव जाणून घेऊन, ते मान्य करून जीवनातील समस्यांच्या उपाययोजनांचा शोध घेते. जसे कि जीवनात दुःख आहे, हे न नाकारता त्याची कारणे शोधून दुःख निवृत्तीच्या उपाययोजनांची चर्चा होताना येथे दिसून येते.

**२) अंतिम ध्येयाकडे वाटचाल :**

ज्ञानासाठी ज्ञान हे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. भारतात मात्र ज्ञानाला पवित्र मानले असले तरी त्यास साधन मानले आहे. दुःखमुक्ती, आत्मानुभूती, ईश्वरानुभूती, मोक्ष ही अंतिम साध्ये मानली असून ज्ञान हे त्यास प्राप्त करावयाचे साधन आहे. म्हणूनच केवळ बौद्धिक कसरत वा कुतूहलपूर्ती (जिज्ञासापूर्ती) हे भारतीय तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट नाही. याच कारणामुळे भारतीय तत्त्वज्ञानात बोजडपणा नसून आनंदमयता आहे. परमशांती वा आनंद हे तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट्य आहे.

**३) सर्वंकष विचार:**

मोक्ष वा दुःखमुक्ती हे अंतिम ध्येय असले तरी भारतीय तत्त्वज्ञानाने ऐहिक जीवनाकडे दुर्लक्ष केलेले नाही. जीवनाच्या सर्व बाजूंचा विचार यामध्ये पहायला मिळतो. चतुर्विध पुरुषार्थात व्यक्ती जीवनाच्या सर्व बाजूंचा विचार दिसून येतो. तर चार आश्रमात व्यक्ती तसेच समाष्टिची रचनात्मक व्यवस्था पहायला मिळते. चार्वाक सोडून सर्वच दर्शनांने धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ मानले आहेत. अर्थार्जन व त्याद्वारे होणारी कामपूर्ती त्याज्य न ठरवता धर्म मार्गाने त्यांची पूर्तता करत-करतच मोक्ष या अंतिम पुरुषार्थाचा विचार केला आहे. या चार पुरुषार्थातून मानवाच्या नैतिक, मानसिक, अध्यात्मिक, सामाजिक जीवनाचा विचार प्रत्ययास येतो. चार आश्रम - ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे योग्यसमयी योग्य कर्तव्ये करत व्यक्ती तसेच समाजजीवनाला कल्याणाकडे घेऊन जातात. चार्वाकांनी जरी अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ स्वीकारले असले तरी अधर्माने वागा असे म्हटलेले नाही, नैतिक मार्गानेच अर्थार्जन व कामपूर्ती सुचविली आहे. 'मरणापमेव अपवर्ग' मानून मृत्यूलाच मोक्ष मानले आहे, एका अर्थाने धर्म व मोक्ष वेगळ्यास्वरूपात या दर्शनात पहायला मिळतो.

**४) पूनर्जन्म व कर्मसिद्धांत :**

चार्वाक वगळता सर्वच दर्शनाने पुनर्जन्म व कर्मसिद्धांत या संकल्पना मानल्या आहेत. या दोन्ही संकल्पनांना ज्याप्रमाणे अध्यात्मिक महत्त्व आहे त्याचप्रमाणे सामाजिक व नैतिक दृष्टीनेही त्या महत्त्वाच्या आहेत. येथील तत्त्वज्ञानानामुळेच या संकल्पना जनमाणसात रुजलेल्या दिसतात. जसे कर्म तसे फळ, करावे तसे भरावे, साताजन्माचा सोबती, पूर्वपुण्याई इत्यादी म्हणी व संकल्पना हे त्याचे उदाहरण आहे. आत्म्याच्या अमरत्वातून पुनर्जन्माची कल्पना आलेली आहे. बौद्ध दर्शनाने मात्र आत्मा न मानताही पुनर्जन्म मानला आहे. चेतना नष्ट होत नाही, चेतनेचा नित्यप्रवाहच पुनर्जन्मास कारणीभूत होतो असे त्यांचे मत आहे.

**५) प्रमाणमीमांसा:**

सर्वच भारतीय दर्शनांमध्ये प्रमाणचर्चा दिसून येते. प्रमाणमीमांसेलाच ज्ञानमीमांसा म्हणतात. ही तत्त्वज्ञानाची महत्त्वाची शाखा आहे. ज्ञानाची यथार्थता-अयथार्थता, ज्ञानाची साधने, ज्ञानाचे प्रामाण्य कसे आहे म्हणजे स्वतःप्रमाण आहे कि परत:प्रमाण आहे इत्यादींची चर्चा ज्ञानमीमांसेत होते. या ज्ञानमीमांसेतूनच तत्वाबद्दलचा निर्णय होतो. कित्येक दर्शनाने ज्ञानानेच मोक्ष मिळतो असेही मानले आहे. भगवद्गीतेत 'नही ज्ञानेन् सदृश्यम् पवित्रम् इह

विद्यते' म्हणजे ज्ञानासारखे पवित्र या जगात काहीच नाही. असे म्हटले आहे. चार्वाक दर्शनाने सुद्धा ज्ञानमीमांसेला प्राधान्य दिले असून त्यातूनच त्यांची तत्त्वमीमांसा व नीतिविचार जन्मलेला आहे. ब्राह्मज्ञानाविषयीचा असणारा ख्यातीवादी याबाबतीत प्रसिद्ध आहे.

## १.६ सारांश

एकूण अस्तित्वाविषयी असणाऱ्या मूलभूत प्रश्नांचा समावेश तत्त्वज्ञानात होतो. पौर्वात्य तत्त्वज्ञानात भारतीय तत्त्वज्ञान अतिप्राचीन असे आहे. वैदिक कालिन नैसरर्गीक व सामान्य स्वरूपाचे तत्त्वज्ञान उत्तरोत्तर विकसित होत गेले. बहुदेवता वादाकडून एकेश्वरवादाकडे व एकेश्ववादाकडून एकतत्त्ववादाकडे ते प्रवाहित झाले. सुरूवातिस अनिष्ट निर्मुर्लन व ऐहिक सुखप्राप्तीस्तव देवतांची स्तवने गाणारा मनुष्य पुढे चालून अंतिम तत्वाच्या ज्ञानार्जनासाठी तृषार्थ होतो. त्याच्याकडे उपजत असणारी जिज्ञासा, सत्य शोधण्याची वृत्ती त्यास स्वस्थ बसू देत नाही. त्यातूनच तत्त्वज्ञानाने ओतप्रोत भरलेल्या महासागराची निर्मिती होते, ती उपनिषदांच्या रूपाने, वेदांतील ज्ञानकांड असलेली ही उपनिषदे वेदांत म्हणून ओळखली जातात. आत्मा, ब्रम्ह आणि जगताच्या एकात्म्याचे ज्ञान देणारी ही उपनिषदे संबंध विश्वाकडे पुजनियतेच्या व आदराच्या दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन देतात. उपनिषदांतील तत्त्वविचारात विश्वैक्य निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. या अनेक उपनिषदांतील विखुरलेल्या विचारांचे सारूप आहे. श्रीमद् भगवद् गीता, या भगवद् गीतेच्या माध्यमातूनच उपनिषदविचार खरंतर काही प्रमाणात जनसामान्यांपर्यंत पोहोचला. या नंतरच्या काळात वैविध्यपूर्ण अशी दर्शने निर्माण झाली, जी प्राचीन भारताता असलेल्या विचारस्वातंत्र्याची ओळख देतात. परमार्थवादी असणारी ही दर्शने जीवनाला अंतिम उद्दिष्ट्ये देऊन जातात.

## १.७ विद्यापीठीय प्रश्न

१) उपनिषदपूर्व तत्त्वज्ञानाची चर्चा करा.

२) तत्त्वज्ञान म्हणजे काय ते सांगून उपनिषदातिल तत्त्वज्ञान विशद करा.

३) 'आत्मा' व 'ब्रम्ह' या उपनिषदीय संकल्पना स्पष्ट करा.

४) उपनिषदांतील जगतविषयक विचार सांगून त्याचे समकालिन महत्त्व विशद करा.

५) भारतीय दर्शनांची सामान्य वैशिष्ट्ये लिहा.

६) भारतीय षडदर्शने थोडक्यात स्पष्ट करा.

टिपा लिहा.

अ) वैदिक व अवैदिक दर्शने

ब) बहुदेवतावाद व एकेश्वरवाद

क) ऋत संकल्पना

ड) भगवद् गीता

*****

# २

# चार्वाक दर्शन

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ चार्वाकांची ज्ञानमीमांसा

  २.२.१ प्रत्यक्षम् एवम् प्रमाणम्

  २.२.२ अनुमान प्रमाणाबद्दल चार्वाक मत

  २.२.३ शब्द प्रमाणाचे खंडन

२.३ चार्वाकांचा जडवाद

  २.३.१ चार्वाकांचा देहात्मवाद

  २.३.२ स्वभाववाद

२.४ मोक्ष संकल्पना

२.५ चार्वाकांचे नीतिशास्त्र

  २.५.१ अर्थ पुरूषार्थ

  २.५.२ काम पुरूषार्थ

२.६ सारांश

२.७ विद्यापीढीय प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

१. चार्वाक दर्शनाचा अभ्यास करता येईल.

२. चार्वाकांची ज्ञानमीमांसा समजून घेता येईल.

३. चार्वाकांचे सत्ताशास्त्र समजून घेता येईल.

४. चार्वाक नीतिशास्त्र अभ्यासता येईल.

## २.१ प्रस्तावना

भारतीय दर्शनांची मळुप्रवृत्ति आध्यात्मिक असली तरी ते पूणतः आध्यात्मिक नाहीत. अध्यात्मवाद वा चेतनवाद (Spiritualism) च्या व्यतिरिक्त जडवाद (Materialism) सुद्धा भारतीय दशानाचे अंग आहे. चार्वाक हे जडवादी (Materialism) दर्शन आहे. त्यानुसार जडातनुच जगताची उत्पत्ती झाली आहे, चेतन हाही जडाचाच अविष्कार आहे.

चार्वाक दर्शनाचा कुठला स्वतंत्र ग्रंथ नाही किंवा चार्वाक दर्शनाचा इतर दर्शनांप्रमाणे कोणी एक प्रणेता नाही.

चार्वाक दर्शन हे भारतीय दर्शनातील खडंण-मंडण प्रक्रियेतून समोर आले. इतर सर्वच दर्शनांनी चार्वाकांचे खडंण करण्यासाठी पूर्वपक्ष म्हणून या मताची माडंणी केली आहे. यातून हेही स्पष्ट होते की चार्वाक दर्शन हे इतर दर्शनांच्या अगोदर विकसित झालेले आहे.

**चार्वाक दर्शनांची विविध नावे व त्याचे अर्थ:**

ज्या नावे हे दर्शन प्रसिद्ध आहे ते म्हणजे चार्वाक. चार्वाक ही संज्ञा दोन स्वतंत्र शब्दांपासून निर्माण झाली आहे.

चारु आणि वाक् मिळून बनते चार्वाक. चारु म्हणजे मधुर तर वाक् म्हणजे वाचा, भाषा. थोडक्यात चार्वाक म्हणजे मधुरभाषी, गोड बोलणारे रुचेल, पचेल, आवडेल असे बोलणारे.

चार्वाक नावाचा विचारवंत होता असेही एक मत आहे. तो जडवादाचा पुरस्कर्ता होता. कालांतराने त्याच्या अनुयायांनी जडवादावर भर दिला. या अनुयायांच्या या गटाला व त्यातील सदस्यांना चार्वाक असे संबोधल्या जाऊ लागले.

'चर्व' म्हणजे चावणे किंवा खाणे. चार्वाक शब्दाची उत्पत्ती 'चर्व' धातू पासून झाली आहे. म्हणून खा, प्या, मजा करा या वृत्तीच्या लोकांना चार्वाक म्हणतात. असेही एक मत प्रचलित आहे आणि ते चार्वाकांच्या सखुवादी विचारसरणीचे द्योतक आहे.

बृहस्पती हा या दर्शनाचा आद्यप्रवर्तक आहे, असे काही विद्वानांचे मत आहे. बार्हस्पत्य सूत्रे बृहस्पतींनी लिहिली आहेत. पण या दहा-बारा सुत्रावरुन हा चार्वाकचा प्रमाणभूत ग्रंथ मानता येत नाही. या देवगुरू समजल्या जाणाऱ्या बृहस्पतीच्या नावावरुन या दर्शनास बार्हस्पत्यदर्शन असेही म्हणतात.

'लोकायतदर्शन' हे या दर्शनांचे आणखी एक नाव आहे. हे नाव मात्र चार्वाक दर्शनाच्या स्वरुपावरुन त्यास पडले आहे. 'लोकांना मान्य होणारे ते लोकायत', असा अर्थ काढता येतो. जनसामान्यांचा या विचारांचे प्रतिनिधीत्व करणारे दर्शन म्हणूनही लोकायत नाव पडले असावे. लोकायत म्हणजे लोक – आयत. लोक म्हणजे इहलोक आणि आयत म्हणजे आधारित. जे इहलोकावर आधारित मत आहे. त्यास लोकायत असे म्हणतात. म्हणूनच डॉ. सवापल्ली राधाकृष्णन म्हणतात-

'इहलोकावरच विश्वास असल्याने चार्वाक मतास लोकायत असे म्हटले जाते.'

(The Sastra is called Lokayata for holds that only this world or loka is) (Ind. Phil. Vol. p२७9) 'लोक' म्हणजे इंद्रिय, असाही एक अर्थ केला आहे. म्हणून इंद्रियांना प्रतित होणारे विश्व म्हणजे लोकायत. लोकायत इंद्रिय प्रत्यक्षच प्रमाणभूत मानतात आणि इहलोकच इंद्रियप्रत्यक्ष असतो.

चार्वाक हे नाव मात्र नंतर म्हणजे इ.सनाच्या सहाव्या शतका नंतर रुढ झाले. लोकायत आणि बार्हस्पत्य ही तुलनेने अगोदरची नावे या दर्शनास होती.

कोणत्याही दर्शनात साधारणतः सत्ताशास्त्र, ज्ञानमीमांसा आणि नितिशास्त्र यांचा सामावेश असतो. त्याच्या ज्ञानमीमांसेवर अवलंबून असल्याने अगोदर आपण त्याचा विचार करुया.

## २.२ चार्वाकांची ज्ञानमीमांसा

चार्वाक दर्शनात प्रमाणशास्त्र म्हणजेच ज्ञानमीमांसेवर सर्वात आधी विचार करण्यात आला. सर्वसाधारण माणसे ज्याप्रमाणे इंद्रियजन्य ज्ञानालाच ज्ञान म्हणतात-त्याचप्रमाणे चार्वाकही त्यांचे प्रतिनिधीत्व करत असल्याने इंद्रिय प्रत्यक्षासच प्रमाण मानतात.

**२.२.१ 'प्रत्यक्षम् एवम् प्रमाणम्':** हे चार्वाकदर्शनाचे हे प्रथम व मुख्यसूत्र आहे. याचा अर्थ असा की प्रत्यक्ष हेच एकमेव प्रमाण होय. एकच प्रमाण मानणारे हे एकमेव दर्शन होय. प्रत्यक्ष म्हणजे जे डोळ्यांसमोर आहे वा डोळ्यांनी दिसते. म्हणून सुरवातीस चार्वाक जे दिसते तेच प्रमाण असे मानत. पण नंतर यात सुधारणा होऊन पंचज्ञानेंद्रियाना ज्याचा अनुभव येतो ते प्रत्यक्ष अशी व्यापक भूमिका चार्वाकांनी घेतली. प्रत्यक्ष ज्ञानासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते.

१) इंद्रिय

२) पदार्थ आणि

३) संनिकर्ष

इंद्रियांच्या माध्यमातून पदार्थाचे प्रत्यक्ष होते. केवळ इंद्रिय आणि पदार्थ असून चालत नाही तर या दोहोंचा संनिकर्ष होणेही आवश्यक असते. इंद्रिये व पदार्थांच्या संयोगालाच संनिकर्ष असे संबोधले जाते. चार्वाकांच्या मते प्रत्यक्ष ज्ञान हे निर्विवाद व निःसंदेह असते. प्रत्यक्षाला अन्य प्रमाणांची अपेक्षा नसते. म्हणूनच म्हणतात प्रत्यक्षे कीं प्रमाणम् । हातच्या कंकणाला आरसा कशाला? ही लोकोक्ति याच अर्थाची सुचक आहे.

### २.२.२ अनुमान प्रमाणाबद्दल चार्वाकमत:

अनुमान हा शब्द अनु आणि मान या दोन पदांनी बनला आहे. अनु म्हणजे नंतरचे आणि 'मान' म्हणजे ज्ञान. अर्थात कशाच्यातरी नंतर ज्याचे ज्ञान होते ते अनुमान. या ठिकाणी प्रत्यक्षावरुन (नंतर) होणाऱ्या अप्रत्यक्षाच्या ज्ञानास अनुमान म्हटले आहे. चार्वाकांनी अनुमानम् अप्रमाणम् असे म्हटले आहे. म्हणजेच त्यांनी अनुमाने हे प्रमाण नाकारले आहे.

**अनुमान प्रमाण नाकारण्यासाठीचे युक्तिवाद:**

१) अनुमान प्रमाण हे व्याप्तिज्ञानावर आधारित आहे. व्याप्ति म्हणजे दोन प्रत्यक्ष गोष्टींचे नित्य साहचर्य जसे की 'जेथे धूर असतो तेथे अग्नि असतो'. धूर आणि अग्नि चे साहचर्य आपण अनेक वेळा पाहिलेले असते. याठिकाणी धूर आणि अग्निमध्ये व्याप्तिसंबंध आहे असे म्हणता येईल. परंतु अनेक ठिकाणी हा व्याप्तिसंबंध (धूर आणि अग्निचे साहचर्य) आपण पाहिलेला आहे म्हणून सर्वच ठिकाणी असा संबंध लावणे म्हणजे अनेकांवरुन सर्वाची सिद्धता देणे होय हा तर्कदोष आहे. म्हणून अशाप्रकारे

काही उदाहरणांवरुन सामान्य नियम प्रस्थापित करणे तर्कसंगत नाही. तर्कशास्त्रात याला विगमनाची समस्या म्हणतात (Problem of Induction).

२) प्रत्यक्षाधारे वा प्रत्यक्षानंतर (अनु) अप्रत्यक्षाचे झालेले ज्ञान् म्हणजे अनुमान. यावरुन ते प्रत्यक्षाइतके स्पष्ट व निसंदेह नसते हेच दिसून येते.

३) अनुमान व्याप्ति संबंधावर आधारित असते, परंतु व्याप्ति ची स्थापनाच होत नाही. व्याप्ति प्रत्यक्षाने स्थापित होत नाही. कारण त्यासाठी ज्या गोष्टींमध्ये व्याप्ति संबंध आहे त्याचे प्रत्यक्ष हे सर्वकाळी व सर्वस्थळी होणे अपेक्षित आहे. पण हे व्यावहारिक दृष्ट्या अशक्य आहे.

जर व्याप्तिची स्थापना खुद्द अनुमानाने करु पाहिले तर अनुमानाची सत्यताही दुसऱ्या व्याप्तिवर अवलंबुन असेल. त्यातून अन्योन्याश्रय दोष उत्पन्न होतो.

शब्द प्रमाणाची सत्यता अनुमानावर आधारित असल्याने त्यानेही व्याप्तिची स्थापना अशक्य आहे. कारण जे अनुमानाच्या बाबतीत घडते ते शब्दाच्या बाबतीतही होणार, म्हणून प्रत्यक्ष, अनुमान व शब्द याद्वारे अनुमानाची स्थापना होत नाही.

चार्वाक कार्यकारण संबंधाला पण सामान्य संबंध मानत असल्याने तोही एक व्याप्ति संबंध ठरतो. म्हणून कार्यकारणाच्या नियमाधारे व्याप्तिसिद्ध करु गेल्यास एका व्याप्तिने दूसरी व्याप्ति सिद्ध करणे असे होईल. याने पुनरावृत्ति हा तर्कदोष घडतो.

प्रा. श्रीनिवास दिक्षित म्हणतात, आपले दैनंदिन व्यवहार सर्वस्वी अनुमानावर अवलंबुन असतात. तहान लागल्यावर पाणी प्यावे, विस्तवावर हात घातल्यास तो भाजेल. हे सुदधा अनुमानाविना समजणार नाही. पूढे ते चार्वाकांनाच घरचा आहेर देतात. ते म्हणतात, “अनुमान हे प्रमाण नाही हे चार्वाकांनी अनुमानानेच ठरविले.”

अनुमानाचे इंद्रियजन्य विषयासंबंधीचे आणि अतिंद्रिय विषयासंबंधाचे अनुमान असे दोन प्रकार करता येतात.

पुरंदर या चार्वाकाने इंद्रिजन्य विषयासंबंधाचे अनुमान स्विकारलेले दिसून येते. पण त्याने इंद्रियातीत विषयासंबंधीच्या अनुमानास नाकारले आहे.

पण पूढे चार्वाकमत काहीसे बदलले आणि त्यांनी इंद्रियजन्य विषयासंबंधीच्या अनुमानास सुद्धा संभाव्यतेच्या कक्षेत टाकले.

### २.२.३ शब्द प्रमाणाचे खंडण:

भारतीय दर्शनांमध्ये शब्द हे तृतीय प्रमाण आहे. चार्वाक मात्र शब्द हे स्वतंत्र प्रमाण आहे, हेच नाकारतात. ते त्याचा समावेश अनुमानातच करतात. अनुमान हे प्रमाणच असिद्ध असल्याने शब्द प्रमाण स्विकारण्यास कारणच उरत नाही, कारण त्याचा समावेश अनुमानातच होतो. शब्द हे प्रमाण नाही यास्तव चार्वाक काही युक्तिवाद देतात.

१) न्यायदर्शनाच्या मते आप्तस्तु वाक्यम् प्रमाणम् । आप्ताचे शब्द प्रमाण मानावयास हवे. आप्त म्हणजे विश्वासनीय व्यक्ति, हितचिंतक. परंतु चार्वाक म्हणतात अमुक एक व्यक्ति आप्त आहे हे ठरवायचे कसे?

२) आप्त व्यक्तिचे शब्द प्रमाण मानावयाचे ठरले, तरी त्याचा समावेश अनुमानातच करावा लागतो.

उदा.

सर्व आप्त पुरुषांचे वचन प्रमाण मानावे.

हा आप्त पुरुष आहे.

म्हणून याचे वचन प्रमाण मानावे.

अशाप्रकारे चार्वाकांच्या मते शब्दाद्वारे प्राप्त ज्ञान अनुमानावरच आधारित आहे. अनुमान प्रमाण नाही, हे आधीच सिद्ध केल्याने त्यावर आधारित शब्दप्रमाण मानणे अनुचित ठरेल.

३) वेदांच्या प्रामाण्यावरच भारतीय दर्शनांचे वैदिक व अवैदिक असे वर्गीकरण करण्यात आहे आहे. वेदांना प्रामाण्य मानणाऱ्यांना वैदिक दर्शन असे म्हणतात. वेद प्रमाण आहेत. कारण त्याचे रचयिता ऋषी आप्त आहेत. परंतु चार्वाक अथिशय तिखट शब्दात बोलतात-

त्रयोवेदस्य कर्तार: धूर्त भाण्ड निशाचरः।

तिन्ही वेद रचणारे धूर्त, भाण्ड आणि निशाचर आहेत. आपले आणि आपल्या पिढ्यांचे पोट भरण्यासाठी वेदांची रचना त्यांनी केली आहे. म्हणून त्यांचे शब्द प्रमाण मानता येत नाही असे चार्वाक म्हणतात.

४) चार्वाकांच्या मते वेदमंत्र त्रिदोषयुक्त आहेत. ते असे,

**अनृत-** यात असे काही मंत्र आहेत जे स्वर्ग नरक पाप-पुण्यासारख्या खोट्या गोष्टींचे प्रतिपादन करतात.

**व्याघात-** वैदिक मंत्रात विरोधाभास आहे.

**पुरनरावृत्ति-** वैदिक मंत्रामध्ये पुनरावृत्तीचा दोष आहे.

५) इंद्रियातीत विषयाची सिद्धता शब्दप्रमाणाद्वारे दिली जाते. उदा. आत्मा-परमात्मा, स्वर्ग-नरक. चार्वांकांच्या मते ही सरळ-सरळ फसवेगिरी आहे. स्वर्ग-नरकाची भीती दाखवून सामान्यजनांना लुबाडण्याचा हा प्रकार आहे. म्हणून शब्द हे प्रमाण नसुन अशा फसव्या लोकांचे साधन आहे.

munotes.in

## २.३ चार्वाकांचा जडवाद/चार्वाकांचे सत्ताशास्त्र:

चार्वाकांच्या ज्ञानमीमांसेतूनच त्यांचे सत्ताशास्त्र निर्माण झाले आहे. चार्वाकांच्या सत्ताशास्त्रास जडवाद असे म्हणतात. त्याचे कारण असे की चार्वाक वस्तुजगताचे अंतिम तत्त्व जड आहे असे मानतात. म्हणजेच ते भौतिक आहे असे मानतात. अभौतिक वा अतिभौतिक तत्व मानणे हे त्यांच्या ज्ञानमीमांसेला धरुन नाही. ज्याचे प्रत्यक्ष होते तेच मानायचे असे एकदा ठरवले म्हणजे ज्ञानाची सीमा भौतिक गोष्टींपर्यंतच राहते. म्हणूनच त्यांना भौतिकवादी (Materialistic) असे म्हणतात. पाच भौतिक तत्त्वे म्हणजे पंचमहाभूते आपणास ज्ञात आहे. भूमी, आप, तेज, वायू व आकाश, चार्वाकांनी मात्र यापैकी चारच भूते मानली आहेत. आकाश या तत्त्वाचे कुठल्याही ज्ञानेंद्रियामार्फत प्रत्यक्ष होत नसल्याने चार्वाक त्यास नाकारतात. या चार महाभूतांच्या संयोगातूनच जडजगत तद्वत चेतनाची निर्मिती होते. आता जडातून जडाची निर्मिती मान्य करण्यासारखी आहे पण जडातून चेतनाची निर्मिती कशी होते? हा प्रश्न शिल्लक राहतो.

या संदर्भात चार्वाक म्हणतात, या चार महाभूतांच्या संयोगाने चेतनाची निर्मिती होते. त्यासाठी ते सुंदर दृष्टांत देतात.

जहभूतविकारेषु चैतन्यंयत्तु दृश्यते।

ताम्बुलपूगचूणानां योगादराग इवोत्थितः

(सर्वदर्शनसंग्रह)

ज्याप्रमाणे पान, सुपारी, कात चुना यांच्या एकत्र सेवनाने म्हणजेच पानाचा विडा खाण्याने लाल रंग निर्माण होतो. या चारही मध्ये स्वतंत्ररित्या लाल रंग असत नाही. अगदी त्याच प्रमाणे भूमी, आप, तेज व वायु मध्ये स्वतंत्ररित्या चेतनत्व नसते. मात्र त्यांचा संयोग झाला म्हणजे चेतन नावाचे नविन तत्त्व अकस्मात निर्माण होते. चैतन्य हे स्वतंत्र गुण वा धर्म नसुन, भौतिक तत्त्वांच्या विकासाचा एक टप्पा आहे.

**भूतेभ्यः चैतन्य-** चैतन्य जडातून निर्माण होते. हा त्यांचा सिद्धांत आहे.

### २.३.१ चार्वाकांचा देहात्मवाद:

चार्वाकांनी इतर दर्शनांप्रमाणे शरीराहून भिन्न असा आत्मा मानलेला नाही. शरीरापेक्षा आत्मा वेगळा करुन – शरीर नष्ट झाले म्हणजे आत्मा शिल्लक राहतो व नंतर त्याचा पुनर्जन्म होतो हे ही त्यांनी नाकारले आहे. शरीर हे जडद्रव्याचा संघात आहे एका विशिष्ट टप्प्यावर जडद्रव्याच्या संघातात चैतन्य हा धर्म निर्माण होतो. तोच चैतन्य विशिष्ट देह हा आत्मा होय. या मताला देहात्मवाद म्हणतात. देहनिर्मितीबरोबर आत्म्याची निर्मिती व देहनष्ट झाला म्हणजे आत्माही नष्ट होणे यासच देहात्मवाद म्हणतात.

### आत्म्याचे निराकरण:

देहाव्यतिरिक्त आत्मा नाही कारण 'मी' हे जे वर्णन आपण करत असतो ते देहाला गृहित धरुनच करत असतो. मी जाड आहे, बारिक आहे, गोरा, सावळा, काळा वगैरे आहे वा उंच

किंवा बुटका आहे, हे देहाचेच तर वर्णन आहे. असे विशेषण असणार तो आत्मा, असे त्यांचे मत आहे.

भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनम् कृतः । हे अर्थात यावरुनच आलेले आहे. पाश्चात्य तत्वज्ञ ह्युमने सुद्धा आत्माचा प्रत्यय येत नाही, म्हणून आत्मा मानलेला नाही. शरीर असे पर्यंतच्या आत्माला मानणाऱ्या या चार्वाकांना जयंत नावाचा नैयायिक सुशिक्षित चार्वाक असे म्हणतो. या चार्वाकांच्या मते, ज्याप्रमाणे आत्मा या जन्मीचे बालपणापासूनचे सर्व स्मरणात ठेवतो. त्याप्रमाणे जर अविनाशी आत्मा मानला तर पूर्वजन्मीच्या गोष्टीही स्मरणात रहायला हव्यात. पण तसे घडत नाही. म्हणून जन्मापूर्वी व मृत्योपरांत आम्त्याला अस्तित्व नाही. प्रत्यक्ष हेच एकमेव प्रमाण असून त्याने नित्य आम्त्याचे प्रत्यक्ष होत नाही. म्हणून तो सिद्ध होत नाही.

### २.३.२ स्वभाववाद:

आम्त्याबरोबर परमात्म्याचे अस्तित्वही चार्वाकांनी नाकारले आहे. विश्वनिर्माता वा विश्वनियंता म्हणून साधारणतः ईश्वराचे अस्तित्व मानले जाते. व्यवस्थित अशा विश्वाचा कोणीतरी व्यवस्थापक असला पाहिजे, असा हा तर्क आहे. पण चार्वाकांच्या मते या जगातिक सर्व घटना चेतनाविरहित भौतिक नियमांनुसार होतात. विश्वातिल व्यवहार स्वभावानुसार होतात. महाभूतांत संयोग होऊन त्यात विकार निर्माण होतो. वैविध्यपूर्ण जगत आकारास येते. त्यासाठी ईश्वर मानण्याची गरज नाही. जे काही घडते ते स्वभावानुसार नुसार घडते. मयुराचे नृत्य, कोकिळेचे गायन, उसाची गोडी, मधाची मधुरता अन कडूलिंबाचा कडवटपणा हा ज्याचा त्याचा स्वभाव आहे. यासाठी कुठे ईश्वर लागतो?

## २.४ मोक्ष संकल्पना

चार्वाक सोडून इतर सर्वच भारतीय दर्शनांनी मोक्ष या पुरुषार्थाचा स्विकार केला आहे. मोक्ष म्हणजे दुःखाची कायमची निवृत्ती, मोक्ष म्हणजे ईश्वरानुभूती, मोक्ष म्हणजे आत्मानुभूती, मोक्ष म्हणजे जन्म मरणाच्या चक्रातून सुटका अशा वेगवेगळ्या व्याख्या दर्शनकारांनी केल्या आहेत. (मोक्ष म्हणजे परमशांती, कैवल्य) यातील कुठल्याही अर्थाने चार्वाकांनी मोक्ष संकल्पना स्विकारली नाही. आत्मा व ईश्वरानुभूती नाकारल्याने या दोन्हींचा अनुभूतीस मोक्ष मानण्याचे कारणच उरत नाही. दुःख ही वास्तव घटना आहे. त्यामुळे त्याची कायमची निवृत्ती शक्य नाही. दुःख ही वास्तव घटना आहे त्यामुळे त्याची कायमची निवृत्ती शक्य नाही. दुःख दुर करावे वा दुःखाचा असर कमी होईल असे काही करावे या मताचा स्विकार ते करतात.

**नित्य असा आत्माच नाकारल्याने जन्म:**

मरणाचा फेरा मानण्यास कारणच उरत नाही व त्यातून सुटका करण्याचाही प्रश्न उभा राहत नाही. जीवनमुक्ती व विदेहमुक्ती दोन्हींचे खण्डन चार्वाक करतात.

नित्य असा आत्मा नाकारून विदेहमुक्ती तर नाकारलीच आहे. पण जीवंत असताना दु:खाचा संपुर्ण उपशम या अर्थाची जीवनमुक्तीही ते नाकारतात. जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत दुःख असणारच. ते कमी करता येते व सुखाची मात्रा वाढवता येते. पण पूर्णतः हा दुःखमुक्ती मृत्यूनंतरच शक्य आहे. म्हणूनच चार्वाक म्हणतात,' मरणमेवापवर्ग: मृत्यू हाच

मोक्ष आहे. (Death is liberation) कोणीही बुद्धिमान मृत्यूची ईच्छा करणार नाही. त्यामुळे चार्वाकांच्या मते मोक्ष हा पुरुषार्थ होऊ शकत नाही. ती एक नैसर्गिक घटना आहे. येथे मृत्यू म्हणजेच मोक्ष असे स्वीकारल्याने इतर दर्शनाची मोक्ष संकल्पना त्यांनी स्पष्ट नाकारल्याची दिसून येते.

## २.५ चार्वाकांचे नीतिशास्त्र

चार्वाकांचे सत्ताशास्त्र ज्ञानमिमांसेवर तर नीतिशास्त्र सत्ताशास्त्रावर आधारित आहे. **थोडक्यात सत्ताशास्त्र व नीतीशास्त्र हे दोन्हीही** ज्ञानशास्त्रावर आधारित आहेत.

मानवी जीवनाचे अंतिम प्रास्तव्य काय? हा नीतीशास्त्राचा महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वच भारतीय दर्शनांनी जीवनातील चार प्राप्तव्ये मानली आहे. त्यांना चतुर्विध पुरूषार्थ असे म्हणतात. 1) धर्म 2) अर्थ 2) काम आणि 3) मोक्ष असे हे चार पुरूषार्थ होत. चार्वाक मात्र यापैकी अर्थ आणि काम हे दोनच पुरूषार्थ मानतात.

धर्म-अधर्म हा शास्त्रांचा विषय आहे. वेदानुकुल कर्म धर्म मानले जातात तर वेद विरोधी कर्म अधर्म मानले जातात. चार्वाक तर वेदप्रामाण्य मानत नाही. म्हणून आपसूकच धर्म हा पुरूषार्थ मानत नाहीत.

चार्वाकांच्या मते वेदांची निर्मितीच मुळात ब्राम्हणांनी लोकांना लुबडण्यासाठी केली असल्याने धर्म हा त्यांचे साधन बनला आहे.

आत्म्याचे अस्तित्वच मानत नसल्याने चार्वाक पुनर्जन्म मानत नाही आणि म्हणूनच मोक्षही मानत नाही. कारण मोक्ष म्हणजे जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ती. मोक्ष म्हणजे कायमची दुःखमुक्ती. ही संकल्पनाही त्यांना मान्य नाही. कारण दुःख हे राहणारच फक्त त्याचा असर कसा कमी करता येईल व सुख कसे वाढवता येईल, याकडे लक्ष द्यावे असे त्यांचे मत आहे. म्हणून मोक्षास पुरुषार्थ मानत नाही. मृत्यूच मोक्ष आहे. कारण त्याने सर्व दुःखे नाहीशी होतात. पण ती एक नैसर्गिक घटना असल्याने पुरुषार्थ होऊ शकत नाही. 'काम' पूर्तीसाठी अर्थ पुरुषार्थाची त्यांनी स्विकृती केली आहे. 'अर्थ' हे साधन आहे. तर 'काम' हे साध्य आहे. त्यामुळे अर्थ परम पुरुषार्थ नाही. 'काम' प्राप्ति हे जीवनाचे अंतिम ध्येय होय.

### २.५.१ अर्थ पुरुषार्थ:

अर्थ हा चार्वाकांनी पुरुषार्थ मानला आहे. पण तो परमपुरुषार्थ नाही. अर्थ या पुरुषार्थाला साधन मूल्य आहे. त्यातुन काम या साध्यरुपी पुरुषार्थाची प्राप्ती करावयाची असते. धनार्जनासाठी मानवाने निरंतर प्रयत्नशील असावे. अर्थार्जन सुद्धा सत् मार्गाने करावे. असे ते सांगतात. म्हणजेच सत्-असत् असा त्यांनी भेद केला होता असे सिद्ध होते. म्हणजेच त्यांनी नैतिक दृष्टिकोन अंगिकारला होता. सर्वदर्शसंग्रहा मध्ये म्हटले आहे.

- कृषिगोरक्ष्यवाणिज्य इण्डनीत्यादिभिर्मुखः।
- दृष्टैरेव सदुषायैर्भोगाननुसवेद् भुमि॥

सूज्ञ व्यक्तिने शेती, गोपालन, व्यापार, शासकीय व्यवस्था यासारख्या साधनांनी अर्थार्जन करावे व भोग भोगावे. हा सत् मार्ग होय. म्हणजेच चार्वाकांनी कुठेही चोरी, लबाडीचे समर्थन केलेले नाही.

असत् मार्गाचाही उल्लेख ते करतात व त्यापासून बाजुला राहण्याचा सल्ला देतात.

भस्म लावुन, वेदपठणाद्वारे पौराहित्य करुन उपजीविका भागवणे हे बुद्धिहिन आणि पौरुषहिन अशा व्यक्तिंचे काम होय. यासाठी तीन वेदांची रचना करणारे हे धूर्त, भाण्ड व निशाचर आहेत असा तिखट आरोप ते करतात. या संदर्भातील त्यांचा श्लोक असा-

अग्निहोत्र त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ।

बुद्धिपौरुष हिनांना जीविका बृहस्पतिः ॥

### २.५.२ काम पुरुषार्थ:

चार्वाकांचा काम हा परम पुरुषार्थ आहे. चार्वाकांचा सुखवाद (Hedonism) याचा समावेश याच पुरुषार्थात होतो. पण चार्वाकांनी फक्त सांसारिक (ऐहिक) सुखांचाच विचार केला आहे. परालोकच मानत नसल्याने पारलौकिक सुखाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यातही जीवन हे सुख दुःखाचे समीकरण आहे. दुःख नाकारता येत नाही. ते आहे ते आहे. ते वास्तव आहे. पण म्हणून त्यास घाबरुन पलायनवादी होऊ नये. दुःख कमी करण्याचा व सुख वाढवण्याचा प्रयत्न करावा. यासाठी ते सुंदर दृष्टांत देतात. काटे आहे म्हणून मासे खाणे सोडावे का? नाही. काटे काढून मासे खा, साळीवरचा तुसा काढा आणि तांदूळ तेवढा घ्या.

सुख प्राप्तीमध्ये त्यांनी काळाचाही विचार केला आहे. आज जे मिळेल जसे मिळेल प्राप्त करुन घ्या. उद्याच्या मोठ्या सुखाच्या नादी लागुन का उद्याच्या मोरासाठी आज हाती असलेले कबुतर सोडू नका. यामध्ये सुखप्राप्तीत मिल्लच्या निकटता या मापदंडाचा विचार येथे दिसून येतो.

**चार्वाकांच्या सुखवादासंदर्भात खालील श्लोक प्रसिद्ध आहे.**

यावत जीवेत सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतम् पिबेत् ।

भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥

**अर्थात:** जो पर्यंत आपण जीवंत आहोत तोपर्यंत सुखाने जगा, प्रसंगी ऋण काढून तुप खा कारण एकदा का देहाचे भस्म झाले, की संपले म्हणजे फिरुन इहलोकी येणे नाही.

या श्लोकाबाबत मतभेद आहेत. काहींच्या मते हा श्लोक चार्वाकांना बदनाम करण्यासाठी त्यांच्या नावे घुसवला आहे. काही विद्वानांच्या मते हा चार्वाकांचा श्लोक आहे, असे मानले तरी काही फरक पडत नाही. तो नैतिकच आहे. डॉ. उदय कुमठेकर म्हणतात, यामध्ये चार्वाकांची काय चुक आहे? ते सरळ म्हणतात सुखाने जगा ऋण काढून तुप प्या – मद्यपान करा असे तर म्हणत नाही ना ।

चार्वाकांनी कुठेही दुसऱ्याच्या सुखाला डावलून 'फक्त स्वतःचेच सुख पहा', असे म्हटलेले नाही. सुखासाठी असत् वर्तन करा, असेही म्हटले नाही. सद्वर्तनाचाच पुरस्कार करा, यासंदर्भातील त्यांचा श्लोक आपण अगोदर पाहिलाच आहे.

कर्ज काढण्याचा सल्ला ते देतात यातही अनैतिक असे काही नाही. उद्योगासाठी कर्ज घेणे हे तर आज सर्रास चालते. कर्ज बुडवा असे तर त्यांनी म्हटलेले नाही. त्यामुळे ह्या श्लोकाने चार्वाक बदनाम होत नाही.

फार-फार तर इंद्रियजन्य सुखाचाच त्यांनी विचार केला असे म्हणता येईल. पण आत्मिक सुखाचा विचार करायला त्यांनी आत्मा मानलेलाच नाही. म्हणून त्यांची मर्यादा इंद्रियजन्य सुखच असणार. अशाप्रकारे जीवनातील विविध सुखांचा उपभोग घेणे आपल्या कामनांची पूर्ती करणे म्हणजे काम हा पुरुषार्थ प्राप्त करणे होय. चार्वाकांच्या मते कामपूर्ती हेच मानवी जीवनाचे अंतीम प्राप्तव्य आहे, असायला हवे.

## २.६ सारांश

पूनर्जन्म, ईश्वर आणि वेद हे तीनही मानत नसल्याने चार्वाक हे सर्वार्थाने नास्तिक दर्शन आहे. नास्तिक म्हणजे पूनर्जन्म न मानणारा, नास्तिक म्हणजे ईश्वर न मानणारा आणि नास्तिक म्हणजे वेद न मानणारा. वेद प्रामाण्य न मानल्याने यादर्शनास अवैदिक दर्शन या वर्गात टाकले जाते. या दर्शनाचा समावेश अवैदिक दर्शनात होतो. ज्ञानमीमांसेतून त्यांचे सत्ताशास्त्र व नीतिशास्त्र निर्माण झाले आहे. अंतिम तत्त्व भौतिक मानणारे चार्वाक भारतीय जडवादी तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते. प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण मानल्याने अतिभौतिकाला यात स्थान नाही. धर्माच्या नावे लोकांस लुबाडणाऱ्या धर्ममार्तंडांचा ते तिखट समाचार घेतात. नैतिक मार्गाने अर्थार्जन आणि त्याचा विनियोगही नीतीनेच करावा, ऐहिक आणि निकट सुखाचाच विचार करावा. अशी वास्तववादी भूमिका चार्वाकांनी घेतली आहे.

## २.७ विद्यापीठीय प्रश्न

१. चार्वाकांची प्रमाणमीमांसा स्पष्ट करून त्याबद्दल तुमचे मत लिहा.

२. चार्वाकांचे सत्ताशास्त्र विशद करा.

३. चार्वाकांच्या नितीशास्त्रावर साधक-बाधक चर्चा करा.

४. टिपा लिहा

   १) चार्वाकांचा देहात्मवाद

   २) चार्वाकांचा स्वभाववाद

   ३) चार्वाकांचे पुरूषार्थ मत

   ४) चार्वाकांची मोक्ष संकल्पना

*****



munotes.in

# ३

# जैन दर्शन

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ जैन दर्शनाची वैशिष्ट्ये

३.३ वास्तवाचे स्वरूप आणि वर्गीकरण

३.४ अनेकांतवाद

३.५ नयवाद आणि स्यादवाद

३.६ त्रिरत्न

३.७ अनुव्रते आणि महाव्रते

३.८ सारांश

३.९ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये

१. जैन दर्शनाची वैशिष्ट्ये समजून घेणे

२. जैन तत्त्वज्ञानातील वास्तवाविषयी दृष्टिकोन जाणून घेणे

३. अनेकांतवाद, नयवाद आणि स्यादवाद या सिद्धांताची वैशिष्ट्ये समजून घेणे

४. त्रिरत्न ह्या संकल्पनेचे महत्त्व जाणून घेणे

५. अनुव्रते आणि महाव्रते यांचे महत्त्व जाणून घेणे

## ३.१ प्रस्तावना

तत्त्वज्ञान भारतीय संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. भारतीय जीवना प्रमाणे भारतीय तत्वज्ञानात ही विविधता आढळते.भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना विविध परंपरा दिसतात. एक परंपरा वैदिक असून दुसरी परंपरा श्रमण परंपरा आहे. प्राचीन काळापासून यज्ञ प्रधान वैदिक संस्कृती बरोबर अहिंसेवर आधारित श्रमण संस्कृती अस्तित्वात होती.

भारतीय दर्शनांचे स्थूल मानाने दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते. काही दर्शने वेदप्रामाण्य स्वीकारतात. तर काही दर्शने वेदप्रामाण्य नाकारतात. वेदप्रामाण्य मानणारी दर्शने आस्तिक दर्शने मानली जातात व वेदप्रामाण्य नाकारणारी दर्शन नास्तिक दर्शने मानली जातात.

न्याय, वैशेषिक, योग, सांख्य, मीमांसा तसेच वेदांत ही दर्शने आस्तिक दर्शने आहेत.

चार्वाक (लोकायत), जैन व बौद्ध ही दर्शने नास्तिक दर्शने आहेत. या घटकामध्ये आपण जैन तत्त्वज्ञानाचा विचार करणार आहोत.

## ३.२ जैन दर्शनाची वैशिष्ट्ये

**जैन तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत:**

१) जैन दर्शन हे 'जिन' महात्म्यांनी प्रकाशित केले. जैन दर्शनात 'जिन' ही उपाधी अशा महात्म्यांना दिली जाते ज्यांनी मनावर, भावनांवर तसेच वाणीवर विजय मिळवला आहे. जैन धर्मातील २४ तीर्थंकरांसाठी 'जिन' हे संबोधन वापरले जाते.

२) जैन धर्मामध्ये श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ आढळतात. हे दोन्ही पंथ जैनांच्या "तत्त्वार्थाधिगम सूत्र" या ग्रंथाला मान्यता देतात.

३) जैन तत्त्वज्ञान अहिंसामूलक तत्त्वज्ञान आहे. अहिंसा या तत्त्वाचा अतिशय सूक्ष्म विचार जैन तत्वज्ञानात केला आहे.

४) अन्य भारतीय दर्शना प्रमाणे जैन दर्शन कर्मवादाचा पुरस्कार करते. जैन दर्शनात कर्मवादाचे अतिशय सूक्ष्म रीतीने तसेच विस्तारपूर्वक विवेचन केलेले आढळते.

५) जैन तत्वज्ञान वास्तववादी सापेक्षतावादी व अनेकवादी आहे. जैनांच्या मते या विश्वात अगणित वस्तू असून प्रत्येक वस्तूला अनंत गुण/पैलू आहेत. या विचारांना अनेकांतवाद असे म्हटले जाते. मानवाचे ज्ञान मर्यादित आहे, त्यामुळे एखाद्या वस्तूच्या सर्व गुणधर्मांचे ज्ञान असंभव आहे.

६) अनेकांतवादाचा दृष्टिकोण वस्तू स्वरूपाच्या किंवा ज्ञानाच्या स्वरूपाच्या अपेक्षेने वापरला तर त्यास नयवाद म्हणतात. नय म्हणजे कोणत्याही वस्तूचे तिच्या संबंधीच्या विशिष्ट दृष्टीकोनातून झालेले ज्ञान होय. अशा अंशरूप ज्ञानाला जैन दर्शनात 'नय' असे संबोधले आहे.

७) अनेकांतवादाचा दृष्टीकोण विधानांच्या अपेक्षेने वापरला तर त्यास स्यादवाद म्हणतात. कोणत्याही विधानाची सत्यता विशिष्ट परिस्थितीत आणि विशिष्ट दृष्टिकोनातूनच पडताळून पाहिली जाऊ शकते. कोणत्याही बाबींचा संदर्भ बदलून विधान करण्याच्या सात पद्धती आहेत. मात्र त्यात विसंगती किंवा परस्पर विरोध नसतो.

८) अनेकांतवाद हा सत्ताशास्त्रीय दृष्टिकोण आहे. नयवाद आणि स्यादवाद प्रमाण शास्त्रीय दृष्टिकोण आहेत. अनेकांतवाद सत्तामिमांसा तर नयवाद आणि स्यादवाद ज्ञानमीमांसा आहेत.

## ३.३ वास्तवाचे स्वरूप आणि वर्गीकरण

जैनांच्या मते सृष्टी मधील अनुभवास येणाऱ्या सद् वस्तूचे अथवा कोणत्याही द्रव्य पदार्थाचे वर्गीकरण जीव किंवा अजीव या प्रकारात करता येते. जीव आणि अजीव दोन्ही गुण आणि पर्याय यांनी युक्त असतात. "गुण-पर्यायवद् द्रव्यम्|" द्रव्याबरोबर अंगभूत तसेच आवश्यक

munotes.in

आणि सदैव सोबत असणा-या गुणधर्मांना जैन दर्शनात 'गुण' ही संज्ञा दिली जाते. द्रव्याच्या अनावश्यक गुणांना 'पर्याय' ही संज्ञा दिली जाते.

**जीव:**

ज्याला चेतना आहे तो जीव होय. "चेतना लक्षणो जीव;|" जे तत्त्व जाणते, विचार करते आणि संवेदनाशील असते ते तत्त्व म्हणजे जीव होय. ज्ञान, संवेदना, विचार आणि संकल्प या सर्व गोष्टी जीव तत्वाशी संबंधित असतात. जीव अनेक असतात. त्यांच्यात चैतन्याचे प्रमाण कमी अधिक असल्याने जीवही वेगवेगळ्या प्रकारचे असतात.

मुक्त जीव: मुक्त जीव उच्च अध्यात्मिक अवस्थेतील तसेच ऐहिक गोष्टींपासून अलिप्त असतात. ते शुद्ध अस्तित्व आणि अनंत जाणीव या अवस्थेत असतात. त्यांना अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुख प्राप्त झालेले असते. अर्हत किंवा तिर्थंकरांसारखे मुक्त जीव संसारी जीवांना मार्गदर्शक असतात.

बद्ध/संसारी जीव: संसारी जीव स्थावर आणि त्रस असे दोन प्रकारांचे असतात.

स्थावर जीव एकूण पाच प्रकारांचे आहेत. वनस्पती ह्या स्थूल स्वरूपात असतात. पृथ्वीकाय, जलकाय, अग्निकाय व वायुकाय हे जागा व्यापणारे, सूक्ष्म स्वरूपात असतात. हे पाचही जीव एकेंद्रिय म्हणजे स्पर्शज्ञान असणारे (त्वगिंद्रिय) असतात.

**त्रस जीव हे चार प्रकारचे असतात.**

१) स्पर्श आणि चव असलेले दोन इंद्रियांचे जीव उदा. कृमी, शंख.

२) स्पर्श, चव आणि गंध असलेले तीन इंद्रियांचे जीव उदा. किडे.

३) स्पर्श, चव, गंध आणि दृष्टी असलेले चार इंद्रियांचे जीव उदा. माशी, भ्रमर.

या तीन प्रकारच्या जीवांना विकलेंद्रिय अशी संज्ञा आहे. त्यांना विशिष्ट मनोज्ञान नसल्यामुळे त्यांना असंज्ञि म्हणजे संज्ञाशून्य असे म्हणतात.

४) स्पर्श, चव, गंध, दृष्टी आणि श्रवण असलेले पाच इंद्रियांचे जीव उदा. गाय, घोडा. मनुष्यास पंचेंद्रियांशिवाय मन आणि विचारशक्ती सुद्धा असते.

जैनांच्या मते जीव चेतना रूप म्हणजे ज्ञानरूप असतो. जीव शरीराहून वेगळा असतो. जीव अनादि कालापासून, अनेक जन्मांमधून नानाविध कर्मे करीत येतो. त्याच्या कर्मजालामुळे जीवाचे ज्ञानरूप झाकोळले जाते.ज्याप्रमाणे मेघांनी झाकोळलेल्या सूर्याची किरणे सर्वत्र पसरत नाहीत त्याप्रमाणे कर्मांनी वेढलेला जीव सर्व काही जाणू शकत नाही.

**जैनांच्या मते शुद्ध व शाश्वत रूपातील जीवाची पुढील वैशिष्ट्ये गुण असतात**

- जीव ज्ञाता, कर्ता आणि भोक्ता आहे.
- जीव अक्षय, शाश्वत स्थितीत असतो.



munotes.in

जीव अरूपी आहे. जीव अस्तिकाय असला तरी तो आकारहीन, रूपहीन आहे. प्रकाश ज्याप्रमाणे जो प्रदेश व्यापतो त्याचा आकार धारण करतो त्याचप्रमाणे जीव सुद्धा जे शरीर धारण करतो त्याचा आकार धारण करतो.

जैनांच्या मते जीव स्वभावतः अनन्त आहे. जीव अनंत चतुष्टय युक्त आहे. जीव अनंत ज्ञानी, अनंत दर्शन, अनंत शक्ती/ अनंत वीर्य आणि अनंत सुखी आहे. परंतु कर्मजालामुळे जीवाचे मूळ शुद्ध स्वरूप झाकोळून जीवाला बद्ध रूप प्राप्त होते. अनंत, अमर्याद अशा शक्तीमुळे जीव कर्माचे आवरण भेदू शकतो. तसेच सम्यकत्वाच्या मार्गाने अनंत सुख ही अवस्था प्राप्त करू शकतो.

**आपले ज्ञान तपासा:**

जैन तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये काय आहेत?

जैन दर्शनात वास्तवाचे वर्गीकरण कश्या प्रकारे केले आहे?

जैन मतानुसार जीवाचे स्वरूप काय आहे?

जैन मतानुसार जीवाचे प्रकार कोणते आहेत?

**अजीव:**

जैनांच्या मते या विश्वातील अजीव हे जाणीवरहित द्रव्य आहे. चैतन्याचा अत्यंत अभाव असणारा द्रव्य पदार्थ म्हणजे अजीव होय. अजीव या पदार्थाचे पाच प्रकार आहेत. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल.

**१) पुद्गल:**

पुद्गल हे विश्वाचे भौतिक द्रव्य आहे. ज्यांच्या लहान-मोठ्या संघातांनी जगातील निरनिराळे अचेतन पदार्थ बनलेले आहेत त्या अणूंना पुद्गगल म्हणतात.

पुद्गल अणू स्वरूपात तसेच स्कंधस्वरूपात असतात. पुद्गलाच्या ज्या अंशाचे विभाजन होऊ शकत नाही त्याला अणु पुद्गल म्हटले जाते. दोन किंवा त्यापेक्षा अधिक अणूंच्या संयोगाला स्कंध म्हणतात.

जैनांनी कथन केलेल्या जीव आणि अजिव या पदार्थांमध्ये पुद्गल हा एकमेव मूर्त पदार्थ आहे. तसेच या पदार्थांमध्ये जीव आणि पुद्गल हे दोनच पदार्थ सक्रिय, क्रियाशील पदार्थ आहेत.

पुद्गगल या शब्दाची व्युत्पत्ती 'पूर्यंते च गलन्ति च' अशी आहे. पुद्गल म्हणजे जे एकत्र येतात किंवा विलग होतात. पुद्गल म्हणजे जे भरतात किंवा जे रिते होतात. पुद्गल या अजीव द्रव्यामध्ये एक सारखी हालचाल सुरू असते. त्यात सतत घडामोडी होत असतात. पुद्गलांमध्ये दोन प्रकारच्या हालचाली सुरू असतात. एक म्हणजे परिस्पंद ज्यात नुसतीच हालचाल किंवा स्पंदन आढळून येते. दुसरी हालचाल म्हणजे परिणाम ज्यामध्ये वस्तूंच्या गुणांमध्ये म्हणजे पर्यायांमध्ये बदल घडून येतात. पुद्गल या पदार्थाला स्पर्श, रस, गंध आणि वर्ण (रूप) हे गुणधर्म असतात.

**२) धर्म आणि ३) अधर्म:**

जैन दर्शनाशिवाय अन्य कोणत्याही दर्शनात धर्म आणि अधर्म हे अजीव पदार्थ स्वीकारलेले नाहीत.जैन मतानुसार धर्म आणि अधर्म हे दोन्ही क्रियाहीन, उदासीन व अमूर्त द्रव्ये आहेत. त्यांचे साक्षात ज्ञान मुक्त जीवालाच होते. धर्म पदार्थाला गती देण्यास व अधर्म पदार्थाला स्थिरता देण्यास सहाय्यक ठरतात.

जैन मतानुसार धर्म हे द्रव्य पदार्थाच्या गतीचे सहायक कारण आहे. परंतु ते त्यातील गतीस प्रेरणा देत नाही. मासा पाण्यात विहरतो. मात्र पाणी माशाच्या गतीशीलतेचे कारण नसते. धर्म हे गतीचे सहायक परंतु उदासीन कारण आहे.

अधर्म हे द्रव्य पदार्थाच्या स्थितीचे, स्थिरतेचे सहायक कारण आहे. वृक्षाची सावली पांथस्थाला धरून ठेवत नाही. परंतु त्या पांथस्थाला विश्रांतीसाठी वृक्षाखाली थांबवते, स्थिर करते.

धर्म आणि अधर्म, गती आणि स्थिती विश्वात एक व्यवस्था निर्माण करतात. विश्वातील विविध पदार्थांच्या गती आणि स्थितीतील परस्परपूरकता आणि सहयोग धर्म आणि अधर्म ह्या द्रव्यांमुळे शक्य होते.

**४) आकाश:**

आकाश हे अजीव द्रव्य अदृश्य असून त्याचे ज्ञान अनुमानामुळे शक्य होते.

जैन दर्शनात जगाचे लोकाकाश आणि अलोकाकाश असे दोन भाग सांगितले आहेत. लोकाकाश जीव आणि अजीव यांनी भरलेला आहे. लोकाकाश हे इतर द्रव्य पदार्थांना अवकाश, जागा करून देते. तसेच त्यांच्या अवगाहनास, हालचालींना सहाय्यभूत होते.

लोकाकाशाचे तीन विभाग आहेत. ऊर्ध्वलोक, अधोलोक आणि तिर्यग्लोक. ऊर्ध्वलोकामधे देवता, अधोलोकामधे विविध आकार, रूपे धारण करु शकणारे नारक आणि तिर्यग्लोकामधे मीन, मकर, गज, मानव इत्यादि जीवांचा वास असतो.

अलोकाकाशात काहीच नाही. ती एक अखंड पोकळी आहे. अलोकाकाश म्हणजे अभावाचे, तळही न दिसणारे एक खोल विवर होय.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व आकाश ह्या द्रव्यांना 'पंचास्तिकाय' म्हणतात. जे अस्तित्वात आहे आणि जे शरीराप्रमाणे जागा व्यापते ते अस्तिकाय होय.

**५) काल:**

काल हे अजीव द्रव्य असून नास्तिकाय आहे. त्याचा विस्तार होत नाही किंवा ते जागाही व्यापत नाही. काल या द्रव्यामुळे अन्य द्रव्यांमध्ये गती, विकार, बदल तसेच परिणाम घडून येतात.

काल या द्रव्याचे दोन प्रकार आहेत. अनादी, अनंत, नित्य व अमूर्त अशा काल द्रव्याला पारमार्थिक किंवा निश्चयकाल म्हणतात. घटका, प्रहर, तास, दिवस, रात्र, वर्ष असा

खंडरूपाने प्रत्ययास येणा-या काल द्रव्याला व्यवहार काल किंवा समय म्हणतात. समय आधारभूत काल द्रव्याचे पर्याय आहेत. समय या काल प्रकाराला सुरुवात असते आणि शेवटही असतो.

वस्तूंच्या अवस्थांमधील बदल, गती, परिणाम, प्राचीन, नवीन, पूर्व, पश्चात इत्यादि भेदांचे आकलन काल या अजीव द्रव्यामुळे संभव होते.

**आपले ज्ञान तपासा:**

जैन दर्शनातील अजीव म्हणजे काय?

जैन तत्त्वज्ञानातील अजीवाचे प्रकार सांगा.

जैन दर्शनातील पुद्गल ही संकल्पना स्पष्ट करा.

**जैन सात तत्त्वे:**

जैन तत्वज्ञानात जीव आणि अजिव हे दोन मूल पदार्थ स्वीकारले आहेत. परंतु विशेष ज्ञान होण्यासाठी, संसारातील दोष जाणण्यासाठी व मोक्षाच्या मार्गाकडे घेऊन जाण्यासाठी वेगळी सात तत्त्वे सांगितली आहेत. पुण्य, पाप, आस्त्रव, संवर, निर्जरा, बंध आणि मोक्ष ही तत्त्वे जैन दर्शनात सांगितली आहेत. जैन दर्शनात कर्म, पाप,पुण्य ह्या गोष्टी मूर्त स्वरूपाच्या व पुद्गलरूपी कर्मकणांच्या बनलेल्या आहेत असे मानले जाते.

१) पुण्य म्हणजे जीवाला चांगले फल मिळवून देणारा कर्म समुदाय होय.

२) पाप म्हणजे जीवाला विपरीत फल देणारा कर्म समुदाय होय.

३) आस्त्रव:

जैन दर्शनात जीव आणि पुद्गल हे दोनच सक्रिय द्रव्ये आहेत. पुद्गल म्हणजेच सूक्ष्म कर्मकणांचा जीवाकडे चाललेला अखंड ओघ म्हणजे आस्त्रव होय. जीवाच्या ज्या कृतीमुळे कर्म द्रव्याचा ओघ सुरू होतो, त्यांनाही आस्त्रव म्हणतात.आस्त्रव म्हणजे जीवरूपी वृक्षामथे कर्मरूपी जल आणणारा पदार्थ होय. आस्त्रव हा 'शुभाशुभकर्मद्वाररूप' आहे. शुभ किंवा अशुभ कर्मबंध निर्माण होणाऱ्या कार्यांना/ द्वारांना आस्त्रव म्हणतात.

**आस्त्रवाचे भावास्त्रव आणि द्रव्यास्त्रव असे दोन प्रकार आहेत.**

जीवनामध्ये घडणाऱ्या ज्या बदलांमुळे कर्म प्रवाह सुरू होतो त्यांना भावास्त्रव म्हटले जाते. भावास्त्रवाचे व त्यायोगे जीवाच्या बंधनाचे पाच प्रकार आहेत. १) मिथ्या दर्शन म्हणजे वस्तूच्या विपरीत स्वरूपाचा, भासाचा स्वीकार. २) अविरती म्हणजे हिंसेसारख्या निषिध्द गोष्टींचा त्याग न करणे. ३) कषाय म्हणजे क्रोध, मान, माया व लोभ हे विकार. ४) प्रमाद म्हणजे वागणुकीचे नियम दुर्लक्षाने मोडणे. ५) योग म्हणजे शरीर, मन व वाणी यांच्या क्रिया. शुभ योग पुण्य जनक आणि अशुभ योग पापजनक असतात.

द्रव्यास्त्रव म्हणजे विविध प्रकारच्या कार्यानुरूप जीवाच्या बंधनास कारणीभूत होणारे कर्मद्रव्य होय. यामुळे जीनांनी सांगितलेल्या तत्त्वांवरील श्रद्धा ढळणे, राग, द्वेष, मत्सर

यासारखे मनोविकार निर्माण होणे, जीवाचा मूळ स्वभाव झाकला जाणे इत्यादि बंधने निर्माण होतात.कर्मबंधांचा नाश झाल्यावरच जीव मुक्त होतो.

**४) 'संवर:**

आस्त्रव निरोधलक्षण: संवर:| जीवाच्या ठिकाणी नवीन कर्म येऊ न देणे, आस्त्रवाचा विरोध करणे म्हणजे संवर होय. सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चरित्र या त्रिरत्नांच्या अनुसरणाने कर्मबंधाचा नाश शक्य होतो.

**५) निर्जरा:**

कर्माचा समूळ नाश झाल्यावरच जीवाला मोक्षप्राप्ती होऊ शकते. नवीन कर्मांचा आस्त्रव थांबविल्यावर तसेच पूर्वीच्या कर्माचा नाश झाल्यावरच मोक्षप्राप्ती शक्य होते. कर्माची बरीवाईट फळे भोगल्यानंतरच कर्मांचा नाश होतो. या कर्मनाशास निर्जरा असे म्हणतात.

**६) बंध:**

पुद्गलाचे जिवाशी मिश्रण झाल्यामुळे बंध निर्माण होतो. जैन मतानुसार कर्म हे पुद्गलरूप आहे जीव हा कर्माच्या शृंखले मुळे बांधला जातो. जीवाच्या राग, द्वेष इत्यादी विकारांमुळे तसेच आस्त्रवाच्या मिथ्यात्व, कषाय,अविरती, प्रमाद व योग या प्रकारांमुळे बंध निर्माण होतो व त्यामुळे कर्म निर्माण होते.

**७) मोक्ष:**

सर्व प्रकारच्या कर्मांचा नाश झाल्याने व कर्मांचा आस्त्रव थांबल्यावर मोक्षप्राप्ती होते. जीवास त्याची मूळची शुद्ध अवस्था प्राप्त होते. मुक्त जीव अनंत दर्शन, अनंत ज्ञान, अनंत वीर्य व अनंत सुख अशी अनंत चतुष्टयाची अवस्था अनुभवतो. मोक्ष हे जीवाचे परमप्राप्तव्य आहे. त्यासाठी जैन दर्शनात सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चरित्र या त्रिरत्नांचा मोक्ष मार्ग सांगितला आहे. (सम्यकदर्शनज्ञानचरित्राणिमोक्ष मार्ग:)

**आपले ज्ञान तपासा**

जैन मतानुसार सात तत्त्वे विशद करा.

जैन दर्शनातील धर्म आणि अधर्म ह्या संकल्पना स्पष्ट करा.

जैन दर्शनातील आस्त्रव म्हणजे काय?

## ३.४ अनेकांतवाद

अहिंसा ही मूलभूत प्रेरणा जैन तत्वज्ञानात अनेकांतवादास प्रेरित करते. जैन मतानुसार अहिंसा या तत्वाला फार व्यापक अर्थ आहे अहिंसा म्हणजे हत्या न करणे तसेच दुसऱ्या जीवावर प्रेम करणे मन उदार करणे. बौद्धिक पातळीवर अहिंसा म्हणजे भिन्नमतसहिष्णुता म्हणजेच अनेकांतवाद होय. जैनांच्या मध्ये कुठल्याही गोष्टीला अनेक बाजू असतात त्यामुळे कोणत्याही गोष्टी संबंधी एकांगी मत बनवू नये, या विचाराला अनेकांतवाद म्हणतात. आपण



munotes.in

कितीही प्रयत्न केले तरी वस्तूचे आपल्यास होणारे ज्ञान व तिचे संपूर्ण स्वरूप यामध्ये भेद राहतोच. आपल्या सामान्य ज्ञानात वस्तू रूपाचा कुठलातरी एकच अंश जाणिवेत येतो बाकीचे अंश जाणिवेत येत नाहीत. वस्तू नेहमीच अनंतधर्मात्मक असते आणि आपले ज्ञान एकान्तक असते.

अनेकांतवादाचा दृष्टिकोण वस्तू स्वरूपाच्या किंवा ज्ञानाच्या स्वरूपाच्या अपेक्षेने वापरला तर त्यास नयवाद म्हणतात. अनेकांतवादाचा दृष्टीकोण विधानांच्या अपेक्षेने वापरला तर त्यास स्यादवाद म्हणतात. नयवाद आणि स्यादवाद दोन्ही अनेकांतवादाचीच रूपे आहेत.

## ३.५ नयवाद आणि स्यादवाद

जैन दर्शनात नय सिद्धांत अतिशय महत्त्वाचा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. नय म्हणजे कोणत्याही वस्तूचे तिच्या संबंधीच्या विशिष्ट दृष्टीकोनातून झालेले ज्ञान होय. नय म्हणजे अनेक गुणधर्म असणा-या वस्तूच्या एखाद्याच गुणधर्मावर ज्ञात्याने त्याच्या स्वत:च्या दृष्टिकोनातून लक्ष केंद्रित करणे. नय म्हणजे अनेक गुणधर्मांपैकी एकावर लक्ष केंद्रित करताना वस्तूच्या अन्य गुणधर्मांना नाकारणे नाही. जैन दर्शनात ज्ञानाचे दोन प्रकार मानले आहेत.

**१) प्रमाण ज्ञान:**

प्रमाण ज्ञान म्हणजे वस्तूचे यथार्थ ज्ञान होय. विविध प्रकारच्या गुणधर्मांच्या, अखंड अशा पदार्थाचे तत्त्वार्थाने आकलन प्रमाण ज्ञानामुळे शक्य होते. जैनांनी प्रमाण ज्ञानाचे प्रत्यक्ष, अनुमान आणि शब्द असे तीन प्रकार मानले आहेत.

**२) नय:**

नय म्हणजे कोणत्याही वस्तूचे तिच्या संबंधीच्या विशिष्ट दृष्टिकोनातून आलेले ज्ञान. नय म्हणजे ज्ञात्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन की ज्या दृष्टीतून अनेक गुणधर्म असणाऱ्या वस्तूच्या एखाद्याच गुणधर्मावर लक्ष केंद्रित केले जाते व त्या गोष्टीबद्दल विधान केले जाते. अशा अंशरूप ज्ञानाला जैन दर्शनात 'नय' असे संबोधले आहे.

**नयवाद:**

नय सिद्धांत जैन दर्शनाच्या ज्ञान मिमांसेतील महत्त्वाचा सिद्धांत आहे. कोणत्याही वस्तूच्या अनेक गुणांपैकी एकावेळी एकाच विशिष्ट गुणावर लक्ष केंद्रित केलेले असते परंतु त्यावेळी त्या वस्तूच्या इतर गुणांचा निषेध केलेला नसतो. ज्याने केवलज्ञान मिळविले आहे अशा सिद्धपुरुषालाच पदार्थांच्या सर्व गुणधर्मांचे ज्ञान एकाच वेळी होऊ शकते. सामान्य माणसे पदार्थाचा एकावेळी एकच गुणधर्म जाणू शकतात. सामान्य व्यक्तीचे ज्ञान नेहमीच अंशरूप असते. अशा अंशरूप ज्ञानाला जैन दर्शनात 'नय' असे संबोधले आहे. नय ज्ञानामधे कोणत्याही वस्तूच्या निरनिराळ्या भागांविषयी तसेच वेगवेगळ्या गुणधर्मांचे वर्णन केलेले असते.

कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी नित्य, स्थिर म्हणजे 'ध्रुव' तसेच अनित्य, अस्थिर, बदलणारे म्हणजे 'पर्याय' असे दोन प्रकारचे अंश असतात.

नयांचे दोन मुख्य प्रकार आहेत. द्रव्यार्थिक नय व पर्यायार्थिक नय. द्रव्यार्थिक नय वस्तूंच्या शाश्वत स्वरूपाला अनुलक्षून असतात. पर्यायार्थिक नय वस्तूंच्या अशाश्वत किंवा अनित्य स्वरूपाला अनुलक्षून असतात.

१) द्रव्यार्थिक नय म्हणजे वस्तूकडे पाहताना तिच्यातील केवळ ध्रुव अंशच लक्षात घेणे. द्रव्यार्थिक नयाचे तीन प्रकार आहेत. नैगम नय, संग्रह नय व व्यवहार नय.

नैगम नयामध्ये वस्तूंचे सामान्य गुण व विशेष गुण यात भेद केलेला नसतो. उदा. आम्रवृक्ष यात वृक्षांचे सामान्य गुण तसेच आम्रवृक्षाचे विशेष गुण अभिप्रेत आहेत.

संग्रह नयामध्ये वस्तूच्या केवळ सामान्य गुणांचा, समुदाय रूपाचा विचार केला जातो. उदा. वृक्ष.

व्यवहार नयामध्ये कोणत्याही वस्तूचे केवळ विशेष गुण लक्षात घेतले जातात. उदा. गुलाब

२) पर्यायार्थिक नय म्हणजे एखाद्या वस्तूकडे पाहताना तिच्यातील केवळ अस्थिर, बदलणारा पर्याय लक्षात घेणे. पर्यायार्थिक नयाचे चार प्रकार आहेत.

ऋजुसूत्र म्हणजे कोणत्याही वस्तूच्या भूतकाळाचा अथवा भविष्यकाळाचा उल्लेख न करता ती वस्तू वर्तमान काळात कशी आहे याचा विचार करणे. ऋजुसूत्रात कोणत्याही वस्तूचा तिच्या वर्तमानच स्थितीला अथवा अवस्थेला अनुसरून विचार केलेला असतो.

शब्द नय  प्रत्येक शब्दाला एक विशिष्ट सांकेतिक अर्थ असतो. शब्दनयामध्ये त्या शब्दाने निर्देशित केलेल्या वस्तूचे ज्ञान मिळवले जाते. या प्रकारात त्या शब्दाचा व्युत्पत्तीने मिळालेला अर्थ गृहीत धरलेला नसतो.

समभिरूढ नयात निरनिराळ्या समानार्थी शब्दांच्या व्युत्पत्तींचे ग्रहण करून योग्य शब्दाचा उपयोग केला जातो.

एवंभूत नयामध्ये एखाद्या वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या त्या त्या परिस्थितीला अनुसरून नांव दिले जाते.

जैन दर्शनात एकूण सात नयांचा निर्देश केला गेला आहे. नैगम नय, संग्रह नय, व्यवहार नय व ऋजुसूत्र नय  हे चार न वस्तू अथवा व्यक्तीच्या संदर्भात असतात. शब्द नय, समभिरूढ नय व एवंभूत नय हे तीन नय शब्दांच्या संदर्भात असतात. नैगम नयाची व्याप्ती सर्वात जास्त असून एवंभूत नयाची व्याप्ती सर्वात कमी असते.

**स्यादवाद:**

जैनांच्या मतानुसार एखादी वस्तू किंवा तिचे गुणधर्म याविषयी काही विधान केले तर ते एका विशिष्ट संदर्भातच खरे असते. संदर्भ जर बदलला तर नेमके त्याच्या विरुद्ध दिसणारे विधानही खरे असू शकते. कोणत्याही वस्तूच्या संबंधाने केलेले विधान सर्व दृष्टीकोनांमधून सत्य असू शकत नाही. त्या विधानाची सत्यता विशिष्ट परिस्थितीत आणि विशिष्ट दृष्टिकोनातूनच पडताळून पाहिली जाऊ शकते. या विचारास स्यादवाद म्हणतात. स्वत:चाच दृष्टिकोण खरा आणि दुस-याचा दृष्टिकोण समजल्यामुळेच वैचारिक मतभेद

निर्माण होतात. यासाठी जैन दर्शनात हत्ती आणि सहा आंधळ्या लोकांचा दृष्टांत दिला आहे. कोणत्याही बाबींचा संदर्भ बदलून विधान करण्याच्या सात पद्धती आहेत. जैन दर्शनात याला ' सप्त-भंगी नय' असेही म्हटले आहे.

**१) स्यात् अस्ति:**

हे सकारात्मक विधान आहे. उदाहरणार्थ कदाचित् फळा काळा आहे. विशिष्ट जागी, विशिष्ट काळात आणि विशिष्ट परिस्थितीत फळा काळ्या रंगाचा आहे.

**२) स्यात् नास्ति:**

हे नकारात्मक विधान आहे. उदाहरणार्थ कदाचित् फळा काळा नाही. विशिष्ट जागी, विशिष्ट काळात आणि विशिष्ट परिस्थितीत फळा काळ्या रंगाचा नाही.

**३) स्यात् अस्ति च नास्ति च:**

असे विधान वस्तू अथवा व्यक्तीच्या संदर्भात असणे किंवा नसणे अशा दोन्ही शक्यतांचे प्रकटीकरण करते. उदाहरणार्थ फळा काळा असूही शकतो आणि काळा नसूही शकतो.

**४) स्यात् अव्यक्तम्:**

एखाद्या विधानात परस्पर विरोधी गुणांच्या दृष्टीने विचार करावयाचा असल्यास व त्याबाबत निश्चितपणे सांगता येत नसल्यास ते 'अव्यक्त' आहे असे म्हणता येते. उदाहरणार्थ फळा काळा आहे की हिरवा, की आणखी काही वेगळ्या रंगाचा, असे निश्चितपणे सांगता येत नाही. जैनांच्या मतानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी किंवा नकारार्थी नसतात. अशावेळी मौन बाळगणे श्रेयस्कर ठरते.

**५) स्यात् अस्ति च अव्यक्तम् च:**

एका विशिष्ट दृष्टिकोनातून एखाद्या वस्तूचे अस्तित्व कळते परंतु दृष्टीच्या अस्पष्ट संकेताने त्याच्या गुणधर्मांचे सुस्पष्ट आकलन होत नाही. उदाहरणार्थ भिंतीवर फळा आहे हे लक्षात येते पण त्याचा रंग नेमका काय आहे याचे ज्ञान होत नाही. वस्तू किंवा व्यक्तीचे भान होते तरी नेमके काय/कोण आहे ते स्पष्ट समजत नाही. म्हणजे वस्तूचे अस्तित्व कळूनही वस्तू अव्यक्त असण्याबाबत हे विधान आहे.

**६) स्यात् नास्ति च अव्यक्तम् च:**

एका विशिष्ट दृष्टिकोनातून एखादी वस्तू नाही असे म्हणता येते. तसेच स्पष्ट दृष्टी नसल्यामुळे काहीच विधान करता येत नाही. उदाहरणार्थ फळा काळा नाही आणि तोही अव्यक्त आहे.

**७) स्यात् अस्ति च नास्ति च अव्यक्तम् च:**

हे विधान सकारात्मक, नकारात्मक अशा दोन्ही दृष्टिकोण आणि अस्पष्टपणाबाबत आहे. उदाहरणार्थ फळा एका दृष्टीने काळा आहे, एका दृष्टीने काळा नाही आणि त्यामुळे अव्यक्तही आहे.

स्यादवाद हा संशयवाद/संदेहवाद नाही. संशयवाद ज्ञानाच्या शक्यतेला नाकारतो. स्यादवादात कोणत्याही गोष्टीचा सर्व बाजूंनी विचार करणे अभिप्रेत आहे. स्यादवाद म्हणजे एखाद्या वस्तूच्या बाबतीत विविध विकल्पांचा, अनेक शक्य असलेल्या बाबींचा विचार करण्याची पद्धती होय. या विचारसरणीमुळे स्वमताचा अतिरेक टाळण्याचा प्रयत्न केला गेला आहे. वस्तूंकडे विशाल व उदार दृष्टिकोनातून पाहण्यासाठी स्यादवादाची मदत होते.

एखाद्या वस्तूसंबंधी अथवा विषयासंबंधी विचार करताना, तो विचार सात वेगवेगळ्या प्रकाराने मांडता येतो. मात्र त्या प्रकारांमध्ये विसंगती किंवा परस्पर विरोध नसतो असे स्यादवादाचे कथन आहे.

**आपले ज्ञान तपासा.**

अनेकांतवाद म्हणजे काय?

स्यादवादाचा सिद्धांत स्पष्ट करा.

नयवाद म्हणजे काय ते सांगा.

## ३.६ त्रिरत्न

अन्य भारतीय दर्शनाप्रमाणे जैन दर्शन मोक्ष हे जीवनाचे अंतिम साध्य मानते. जैन मतानुसार जीवाच्या बंधनाचे मुख्य कारण पुद्गल आहे. पुद्गल कणांचा प्रवाह थांबवणे म्हणजे संवर होय. तसेच जुन्या पुद्गल कणांचा क्षय होणे म्हणजे निर्जरा होय. जैन मतानुसार बंधनाचे कारण राग लोभ, अहंकार आणि माया आहे. या विकारांचे कारण अज्ञान आहे. जिवाच्या बंधन मुक्ततेसाठी तीन रत्ने आवश्यक आहेत. त्रिरत्ने म्हणजे सम्यक दर्शन सम्यक ज्ञान आणि सम्यक चरित्र होय. "**सम्यकदर्शनज्ञानचरित्राणिमोक्ष मार्ग:|**"

**१) सम्यक् दर्शन:**

तीर्थंकरांवर व त्यांच्या उपदेशावर संपूर्ण श्रद्धा असणे म्हणजे सम्यक् दर्शन होय. सम्यक दर्शनाची आठ अंगे आहेत:

१) नि:शंकित- संशय किंवा संदेह यापासून मुक्ती

२) निष्कांक्षित - ऐहिक सुखोपभोगांच्या इच्छेपासून मुक्ती

३) निर्विचिकित्सित - शरीराबद्दलची प्रीती किंवा अप्रीती यापासून मुक्ती

४) अमूढदृष्टी - चुकीच्या मार्गाकडे जाण्याच्या प्रवृत्ती पासून मुक्ती

५) उपगूहन - ज्यांचा जैन तत्वांवर पूर्ण विश्वास नाही अशांचे दोष दूर करणे

६) स्थितीकरण - सम्यक श्रद्धेवर प्राण्यांना स्थिर करणे

७) वात्सल्य - सदाचरणी व्यक्तीबद्दल प्रेमळ आदर असणे

८) प्रभावना- जैन तत्त्वांचे महत्व विशद करणे.

सम्यक दर्शनात अज्ञानापासून व अंधश्रद्धेपासून दूर असणे अभिप्रेत आहे. अंधश्रद्धेवर आधारित तीन प्रकारचे अज्ञान सांगितले आहेत: लोक मूढ, देव मूढ व पाषंढी मूढ. अंधविश्वासावर आधारित समजूतींपासून मुक्तता पावणे ही सम्यक दर्शनासाठी योग्य स्थिती होय.

सम्यक दर्शनासाठी आठ प्रकारच्या गर्वांपासून दूर राहणे आवश्यक आहे: ज्ञानासंबंधी गर्व, पुजेसंबंधी गर्व, कुलासंबंधी गर्व, ज्ञातीसंबंधी गर्व, बलासंबंधी गर्व, संपत्ती भरभराट अथवा लाभ यासंबंधी गर्व, तपासंबंधी गर्व आणि शरीरासंबंधी गर्व हे आठ प्रकारचे दोषपूर्ण गर्व आहेत.

**२) सम्यक् ज्ञान:**

सम्यक् दर्शनानंतर सम्यक ज्ञान प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दिवा आणि त्याचा प्रकाश याचे जसे नाते असते तसेच सम्यक् दर्शन व सम्यक् ज्ञान यांचे नाते आहे. सत्य ज्ञानाचे आकलन झाल्यानंतर त्यातील शंका व संदिग्धता दूर झाल्यानंतरच सम्यक् ज्ञान होते. सम्यक् ज्ञान पाच प्रकारचे असते.

१) मती ज्ञान- इंद्रिये आणि मन यांच्या सहाय्याने जीव आणि अजीव याबाबत झालेले ज्ञान.

२) श्रुत ज्ञान - धर्मग्रंथांच्या वाचनाने किंवा श्रवणाने प्राप्त झालेले ज्ञान.

३) अवधि ज्ञान- दूरचा काल अथवा स्थान याबद्दलचे ज्ञान.

४) मन:पर्याय ज्ञान - दुसऱ्यांचे विचार आणि भावना या बद्दलचे ज्ञान.

५) केवलज्ञान - स्थलकालाच्या पलीकडील असे परमज्ञान

**सम्यक् ज्ञानाच्या संदर्भात आठ गोष्टी महत्वाच्या ठरतात.**

१) ग्रंथ- शब्दांचा योग्य उपयोग

२) अर्थ - त्या शब्दांच्या अर्थाचे पूर्ण ज्ञान

३) उभय - शब्द व अर्थ यांचा संयोग

४) काल - कालसापेक्ष नियमितता व औचित्य

५) विनय- आदर दर्शविण्याची वृत्ती

६) सोपधान - आचरणातील औचित्य

७) बहुमान - उत्साह

८) अनिहन - ज्ञान व त्याची उगमस्थाने न लपविणे

**३) सम्यक् चरित्र:**

वाचा, शरीर आणि मन यासंबंधी म्हणजे आचरणासंबंधी नियम विशद करणे.

त्रिरत्नांचा उद्देश जीवाला मोक्षाप्रत नेण्याचा असतो. मोक्ष मार्गात संवर आणि निर्जरा या दोन तत्त्वांचे फार महत्त्व आहे. ह्या दोन तत्त्वांचे पालन होण्यासाठी सम्यक चरित्राचे नियम बनविलेले आहेत. संवर म्हणजे नवीन कर्मदोष निर्माण होऊ नयेत आणि निर्जरा म्हणजे पूर्वीच्या कर्माचा नाश यासाठी काही नियम आहेत.

**१. `गुप्ती:**

गुप्ती म्हणजे आत्मसंयमनाने आंतरिक स्वभावाचे नियमन करणे होय. मनोगुप्तीने मानसिक संयम, वाग् गुप्तीने वाणीचे नियंत्रण आणि कायगुप्तीने स्वत:च्या शारिरीक क्रियांचे नियमन साध्य केले जाते.

**२. `समिती:**

अहिंसेच्या तत्त्वाचे काटेकोर पालन व्हावे म्हणून पांच समिती सांगितल्या आहेत.

ईर्या समिती म्हणजे कोणत्याही जिवाणूची हिंसा होऊ नये यासाठी निश्चित मार्गाने चालणे.

भाषा समिती म्हणजे कटू शब्दांनी इतरांच्या भावना न दुखावण्यासाठी भाषेवर नियंत्रण ठेवणे.

एषणा समिती म्हणजे हिंसा होणार नाही या प्रकारे उचित भिक्षा घेणे. आदान निक्षेप समिती म्हणजे वस्तू घेताना आणि ठेवताना सतर्क असणे. उत्सर्ग समिती म्हणजे नैसर्गिक विधींबाबत सतर्कता बाळगणे.

**३) दशलक्षण धर्म:**

जैन मतानुसार दहा तत्त्वांचे पालन करणे आवश्यक ठरते. ते दहा धर्म म्हणजे सत्य, क्षमा, मार्दव, शुचिता, तप, संयम, त्याग, विरक्ती, ब्रम्हचर्य अकिंचन्य.

**४) अनुप्रेक्षा:**

जैन मतानुसार जीव आणि अजिव यांच्या स्वरूपाचे, त्यातील बारा पैलूंचे वारंवार चिंतन करण म्हणजे अनुप्रेक्षा होय.

**५) परिषह:**

मोक्ष मार्गातून न ढळण्यासाठी जे शारीरिक कष्ट क्षुधा, थंडी, गर्मी, तहान, पुष्कळ चालणे, इत्यादि सहन केले जातात त्यांना परिषह असे नाव आहे.

**६) पाच व्रते:**

सम्यक् चरित्राची महत्त्वाची पायरी पाच व्रते अनुसरण्याची आहे. अहिंसा, सुनृत, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही पाच व्रते होत.



munotes.in

## ३.७ अनुव्रते आणि महाव्रते

श्रावकांनी ही व्रते अतिशय कठोरपणे आचरणात आणायची आहेत त्याला महाव्रते म्हटले जाते. महाव्रतांचे अनुसरण श्रावकाला संपूर्ण विरक्ती कडे घेऊन जाते. सामान्य माणसासाठी ही व्रते थोडीफार शिथिल स्वरुपात आचरण्याची अपेक्षा केली जाते त्यांना अनुव्रते म्हटले जाते. जैनांनी पंच व्रतांना अत्याधिक महत्त्व दिलेले आहे.

**अहिंसा:**

अहिंसा हे तत्त्व जैन दर्शनाचे आधारभूत तत्त्व आहे. जैनांच्या मते गतिशील तसेच स्थावर द्रव्यांमधेही जीवाचा वास असतो. जैन मतानुसार सर्व जीव मूलतः समान आहेत. जे जीवन आढळते, त्याविषयी आदरभाव बाळगणे हे प्रत्येक साधकाचे कर्तव्य आहे. चल अथवा अचल अश्या प्रत्येक बाबीत जीवन असते. अहिंसा म्हणजे सर्व प्रकारच्या जीवांच्या हिंसेचा त्याग. अहिंसा म्हणजे अतिशय सूक्ष्म जीवाणू, प्राणी, वनस्पती तसेच मानव यांना कोणतीही इजा न करणे. जैन मतानुसार अहिंसा तत्त्वाला अतिशय व्यापक अर्थ आहे. जैनांच्या मते अहिंसा हे तत्त्व केवळ निषेधात्मक नसून सकारात्मक सुद्धा आहे. अहिंसेचे पालन मनाने म्हणजे विचारांनी, वाणीने म्हणजे शब्दांनी, कर्माने म्हणजे प्रत्यक्ष कृतीने केले पाहिजे. अहिंसा तत्त्वाचे पालन आपल्या विचारांमध्ये, बोलण्यामध्ये तसेच कृतीतून होणे आवश्यक आहे. हिंसक विचार, अपशब्द अथवा प्रत्यक्ष कृतीने हिंसा होणार नाही याची दक्षता प्रत्येकाने घ्यायला हवी.

अहिंसा तत्त्वाचे पालन होण्यासाठी साधकामधे चार भावना विकसित होणे अपेक्षित आहे. सर्व प्रकारच्या जीवांसाठी मैत्री, आपल्यापेक्षा अधिक विकसित जीवांना पाहून आनंदित होणे (मुदित), दु:खी-दीनांसाठी करूणा वाटणे व जे त्रास देतात त्यांच्याविषयी उपेक्षा या चार भावनांचा परिपोष व्हायला हवा.

अहिंसा तत्त्वाचे महाव्रत म्हणून पालन करताना साधकाने कीटकाला सुद्धा इजा होऊ नये याची दक्षता घ्यायला हवी. जैन साधू त्यामुळेच मुखपट्टी वापरतात आणि छोटी चवरी हाती बाळगतात.

अहिंसा तत्त्वाचे अनुव्रत म्हणून पालन करताना गृहस्थाने क्रूरता, कोणाच्याही मृत्यूस कारणीभूत होणे, आत्महत्या, भ्रूणहत्या, विध्वंसक कारवाया तसेच कोणालाही. अस्पृश्य मानणे अशा गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे.

**सुनृत:**

अहिंसा तत्त्वाला अनुसरूनच असत्याचा परित्याग करण्याचे व्रत सांगितले आहे. याचा उद्देश स्वार्थासाठी किंवा अन्य कारणांमुळे खोटेपणा करू नये हा आहे. असत्य भाषणाने मनुष्याला लघुता प्राप्त होते.तसेच असे भाषण दुसऱ्या व्यक्तीच्या दु:ख देते. ही एक प्रकारची हिंसाच ठरते. जैनांच्या मते सत्य वचन सुद्धा मधुर अथवा प्रिय वचन असावे. सुनृत हे व्रत सत्याचा अधिक व्यापक अर्थ विशद करते.

अनुव्रत म्हणून सुनृताचे पालन करताना खोटे निर्णय न देणे, व्यापार करताना खोटी वजने न वापरणे, खोटी साक्ष न देणे, खोटे दावे दाखल न करणे, बनावट कागदपत्रे न तयार करणे, एखाद्या व्यक्तीच्या गोपनीय बाबी स्वार्थासाठी न उघड करणे, अभिप्रेत आहे.

**अस्तेय:**

अस्तेय हे व्रत चोरीचा निषेध करते.परक्याचे धन स्वत: न घेणे तसेच ते दुसऱ्या व्यक्तीला न देणे म्हणजे अचौर्य व अदत्तादान होय. मानवी जीवनात निर्वाहासाठी धनाची आवश्यकता भासते. त्यामुळे जैन मतानुसार धनाला बाह्य जीवन मानले जाते. धनाचा अपहार म्हणजे एक प्रकारे हिंसाच ठरते.

अस्तेय या अनुव्रतात परक्याचे धन न घेणे, चोराला मदत न करणे, चोरीच्या वस्तू खरेदी न करणे, व्यापारात खोटेपणा न करणे, कायद्याने बंदी असलेल्या बाबींचा व्यवहार न करणे, स्वसामर्थ्याचा गैरवापर न करणे, अपेक्षित आहे.

**ब्रह्मचर्य:**

मनुष्य वासनांच्या आहारी जाऊन अनैतिक कृत्ये करण्यास प्रवृत्त होतो. ब्रह्मचर्य पालन म्हणजे वासना व इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे. जैनांच्या मते ब्रह्मचर्य म्हणजे सर्व प्रकारच्या कामनांचा, उपभोगांचा, लालसांचा त्याग होय. सर्व प्रकारच्या सूक्ष्म, भौतिक तसेच पारलौकिक वस्तूंच्या मोहाचा त्याग ब्रह्मचर्य या व्रतामध्ये अपेक्षित आहे. ब्रह्मचर्य या अनुव्रतात सामान्य मनुष्याने ब्रह्मचर्य पालन करणे, अनैसर्गिक कृत्य न करणे, अनैतिक संबंध न ठेवणे अपेक्षित आहे. ब्रह्मचर्य पालन शरीराने, भाषणाने तसेच मनाने व्हायला हवे.

**अपरिग्रह:**

अपरिग्रह म्हणजे सर्व प्रकारच्या आसक्तिंपासून अलिप्त होणे. मनुष्य सांसारिक जीवनात अनेक वस्तूंची आसक्ती बाळगून असतो. मनुष्य भौतिक विषयांशी रूप, स्पर्श, गंध, चव, शब्द अशा अनुभवातून जोडला जातो. अशा भौतिक विषयांचा परित्याग करणे म्हणजे अपरिग्रह होय. जीवाला मोक्षाप्रत जाण्यासाठी ह्या विश्वाबद्दल निरासक्त होणे आवश्यक ठरते. वैश्विक बाबींबद्दल अलिप्तता विचारांतून, शब्दांतून तसेच कृतीतून व्हायला हवी.

अपरिग्रह या अनुव्रतात आपल्या गरजांपेक्षा अधिक वस्तूंचा संग्रह न करणे होय. एखाद्या व्यक्तीचे अतिरिक्त संपत्तीचे संचयन दुसऱ्या व्यक्तीच्या गिरिबीचे कारण ठरू शकते.ही सुद्धा एक प्रकारची हिंसाच ठरते.लाच किंवा भेटवस्तू न घेणे, विनाकारण अतिरिक्त मोबदला न घेणे, विनाकारण उपचार सुरू न ठेवणे, हुंडा न घेणे म्हणजे अपरिग्रह होय.

**आपले ज्ञान तपासा**

जैनांच्या मतानुसार मोक्षमार्ग काय आहे?

सम्यक् ज्ञान म्हणजे काय?

सम्यक् दर्शन म्हणजे काय?

सम्यक् चरित्र म्हणजे काय?

अनुव्रते आणि महाव्रते कोणते आहेत?

## ३.८ सारांश

जैन दर्शन वेदप्रामाण्य नाकारणारे नास्तिक दर्शन आहे. जैन तत्त्वज्ञान अहिंसेचा पुरस्कार करते. जैनांच्या मतानुसार या विश्वात अगणित वस्तू असून प्रत्येक वस्तूला अनंत गुण असतात. जैन दर्शन वास्तववादी सापेक्षतावादी व अनेकवादी आहे. त्यांच्या मते अनुभवास येणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंचे जीव आणि अजीव असे दोन द्रव्यांमध्ये वर्गीकरण करता येते. जीवाचे मूळ शुद्ध स्वरूप अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुखी आहे. अजीव या द्रव्याचे पुद्गल धर्म, अधर्म, आकाश आणि काल असे पाच प्रकार आहेत. याशिवाय जैन दर्शनात सात तत्त्वे सांगितली आहेत. पुण्य, पाप, आस्रव, संवर, निर्जरा, बंध आणि मोक्ष ही सात तत्त्वे जैन दर्शनात स्विकारली आहेत. अहिंसा ह्या मूलभूत प्रेरणेतून बोद्धिक पातळीवर अनेकांतवादाचा उगम होतो. ज्ञानाच्या स्वरूपाच्या अपेक्षेने नयवाद आणि विधानांच्या अपेक्षेने स्यादवाद अशी अनेकांतवादाचीच रूपे आहेत. जैन मतानुसार मोक्षाप्रत जाण्यासाठी सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चरित्र असा मार्ग सांगितला आहे. सम्यक् चरित्रानुसार सर्वांना पांच व्रतांचे, अहिंसा, सुनृत, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह यांचे पालन करणे आवश्यक ठरते. श्रावकांसाठी ह्या व्रतांचे पालन कठोरपणे करणे अपेक्षित आहे. त्यांच्या साठी ही महाव्रते ठरतात. सामान्य माणसांसाठी ही पाच व्रते थोडी सौम्य स्वरूपात आचरणे अभिप्रेत आहे. सामान्य लोकांसाठी हीच व्रते अनुव्रते ठरतात.

## ३.९ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. जैन दर्शनात वास्तवाचे वर्गीकरण कश्या प्रकारे केले आहे?

२. जैन मतानुसार जीवाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. जैन तत्त्वज्ञानातील अजीवाचे प्रकार सांगा.

४. जैन मतानुसार सात तत्त्वे विशद करा.

५. जैनांच्या मतानुसार मोक्षमार्ग काय आहे?

६. अनुव्रते आणि महाव्रते विशद करा.

*****

munotes.in

# ४

## बौद्ध तत्त्वज्ञान

**घटक रचना**


४.० उदिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ चार आर्यसत्य

४.३ आर्य अष्टांग मार्ग

४.४ अनात्मवाद

४.५ क्षणिकवाद

४.६ सारांश

४.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न


## ४.० उदिष्टे

१. बुद्धांचे जीवन समजून घेणे

२. बुद्ध तत्त्वज्ञान समजून घेणे

३. बौद्धांच्या नितीशात्र चा अभ्यास करणे

४. चार आर्यसत्य आणि आर्य अस्टांगमार्गाचा अभ्यास करणे

५. क्षणिकवाद अनात्मवाद या संकल्पना समजणे

## ४.१ प्रस्तावना

भारतीय तत्त्वज्ञाना मध्ये बौद्ध तत्त्वज्ञान हे एक महत्वाचे तत्त्वज्ञान आहे. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान मानव केन्द्री असून मानवाचे दुःख नष्ट करणे हा या तत्त्वज्ञाना चा उद्देश आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाला नास्तिकवादी तत्त्वज्ञान आहे . कारण वेदांचे प्रमाण हे तत्त्वज्ञान अमान्य करते. गौतम बुद्ध सत्ताशातारीय संकल्पना ची चर्चा न करता मानवाच्या दुःखा चे निरसन करण्यावर भर देतात. मानवाच्या दुःखा चे कारण शोधून ते कारण नष्ट करणे हे बौद्ध तत्त्वज्ञाना उदिष्टे आहे . गौतम बुद्धाने चार आर्य सत्य आणि अस्टांगमार्गाचा उपदेश दिला . जो व्यक्ती या मार्गाचा अवलंब करेल त्याला या दुःख तून मुक्ती मिळते आणि निर्वाण प्राप्त होऊ शकते, निर्वाण हि एक अशी मनाची स्थिती आहे ज्या मध्ये दुःखा चा अभाव , आनंद आणि शांतता यांचा अनुभव येतो. बुद्धांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञाना चे पालन करून माणवाला आपले दुःख कायमचे नष्ट करता येऊ शकते असे आशावादी तत्त्वज्ञान बुद्धांनी मांडले.



munotes.in

## ४.२ बुद्धांचे जीवन

गौतम बुद्ध (५६३ - ४८३ ) एक महान तत्त्ववेत्ता, समाजसुधारक आणि बौद्ध धर्माचे संस्थापक होते. ई. पू. ५६३ मध्ये लुंबिनी येथे जन्मला. गौतम बुद्धाचे जन्मनाव सिद्धार्थ होते. राजा शुद्धोदन वडील आणि राणी महामाया आई होती. त्यांच्या जन्माच्या सातव्या दिवशी त्यांच्या आईचे निधन झाले. आई गमावल्यानंतर सिद्धार्थची मावशी महाप्रजापती गौतमीने त्यांना लहानपणी वाढवले. राजकुमार सिद्धार्थ गौतमास आवश्यक असे सर्व शिक्षण देण्यात आले. यशोधरा या सुंदर राजकुमारीशी सिद्धार्थ गौतमाचा विवाह झाला व पुढे त्यांना राहुल नावाचा एक पुत्र प्राप्त झाला

सिद्धार्थने वयाच्या २९ व्या वर्षी जीवनाच्या सत्याच्या शोधात ग्रह त्याग केला. त्यानी सुखी आणि समृद्धी जीवन सोडले. गृहत्यागानंतर सिद्धार्थ गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खूप चिंतन केले, कठोर तपस्या केली. ६ वर्षांच्या कठोर तपश्चर्ये नंतर, आताच्या बिहार राज्यातील गया येथे निरंजना नदीच्या काठी पिंपळाच्या वृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली. या 'दिव्य ज्ञाना'ला 'संबोधी', 'बुद्धत्व' किंवा 'निर्वाण' असेही म्हणतात. ज्ञानप्राप्तीनंतर सिद्धार्थ गौतमाला सर्वजण 'बुद्ध' असे म्हणू लागले. बुद्ध ही व्यक्ती नव्हे ती ज्ञानाची अवस्था आहे. 'बुद्ध' म्हणजे अतिशय ज्ञानी मनुष्य. बुद्धांना ज्या पिंपळाच्या वृक्षाखाली 'बुद्धत्व' प्राप्त झाले त्या वृक्षाला 'बोधी वृक्ष' हि असे म्हणतात. वयाच्या ८० व्या वर्षी तथागत बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले.

बौद्ध तत्त्वज्ञान हे अगदी साधे, समजण्यास सोपा, नैतिक तत्त्वांवर आधारित आणि मानवता, करूणा व समानता ह्यांचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान आहे. गौतम बुद्धांनी तत्कालीन रूढी-परंपरांचे, अंधविश्वासाचे, खंडन करून एका सहज सोप्या मानवधर्माची स्थापना केली. ते म्हणतात, आपल्या जीवनात संयम, सत्य आणि अहिंसेचे पालन करून पवित्र आणि साधे जीवन व्यतीत करावयास हवे. त्यांनी कर्म, भाव, आणि ज्ञानासमवेत 'सम्यक' साधनेवर भर दिला कारण कुठलीही 'अतिशयोक्ती' शांतता देऊ शकत नाही. गौतम बुद्धानी मध्यम मार्ग सांगितला , अतिशय सुख समृद्धी चे आणि अतिशय क्लेशदायक अश्या दोन्ही टोकांचा त्यांनी विरोध केला आणि मध्यम मार्ग सानिताला.

munotes.in

बुद्धानी प्राप्त झालेल्या ज्ञानाचा सर्व मानवांच्या कल्याणासाठी प्रसार करण्याचा निर्णय घेतला. इतरांना दुःखापासून मुक्त करणे हे त्यांचे उद्दीष्ट होते. वाराणसी जवळील सारनाथ येथे ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर बुद्धाची पहिली शिकवण "चार आर्य सत्य" या विषयावर झाली. चार आर्य सत्य हे बौद्ध धर्माचे मुख्य शिकवण आहे; या चार आर्य सत्याच्या आधारे दुःखाचा नाश करणारे तत्त्वज्ञान गौतम बुद्धांनी सांगितले. बुद्धाचा दृष्टिकोण अतिशय व्यावहारिक होता. कोणते हि कर्मकांड नसांगता त्यांनी दुख नष्ट करण्याचा वैचारिक मार्ग सांगितला.

## ४.२ चार आर्य सत्य

चार आर्य सत्ये म्हणजे असे मूलभूत घटक आहेत, जे आपल्या समस्यांपासून मुक्ती मिळवून देणाऱ्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करतात. ही बुद्धाची पहिली शिकवण आहे, जी संपूर्ण बौद्ध शिकवणीच्या आधार आहे.. चार आर्य सत्यांच्या अभ्यासाने आपल्या दैनंदिन समस्यांचा

सामना करण्यासाठी मदत होते. थोडक्यात, आपल्याला खरे दुःख ओळखायला हवे, दुःखाच्या मूळ कारणांपासून मुक्ती मिळवायला हवी, दुःखापासून खऱ्या अर्थाने मुक्ती मिळवायला हवी आणि चित्तशांतीचा खरा मार्ग ओळखायला हवा.

बुध्द धम्म समजून घेण्यासाठी ही चार आर्यसत्य समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्रिपिटकात चार आर्यसत्यांचा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला आहे. ही चार आर्यसत्य गौतम बुध्दाच्या धम्माचा पाया आहे असे म्हटले जाते. गौतम बुध्दाने प्रथमत: पांच परीव्राजकांना सारनाथ येथे या चार आर्यसत्यांचा उपदेश केला.

बौद्ध तत्त्वज्ञान हे एक नास्तिकवादी तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते, कारण बुद्धांनी वेदांना प्रामाण्य मानले नाही. कर्मामुळेच जीवनात सुख व दुःख येते. त्यामुळे सर्व कर्मातून मुक्त होणे म्हणजेच निर्वाण प्राप्त होणे अशी बौद्ध तत्त्वज्ञाना ची शिकवण आहे. कर्मातून मुक्त होण्यासाठी आणि ज्ञान प्राप्त करण्यासाठी चार आर्य सत्य समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी अष्टांग मार्गाचा अभ्यास केला पाहिजे . अष्टांग मार्गाचे तंतोतंत पालन केल्याने निर्वाण प्राप्त होऊ शकते

### ४.२.१ पहिले आर्य सत्यः जग हे दु:खमय आहे:

पहिले आर्यसत्य जीवन दु:खमय आहे. या जगांत दु:ख आहे हे मनुष्याने प्रथमत: जाणले पाहिजे. जन्म, बालपण, वर्धापकाळ, आजार , मृत्यू हे सर्व दुकःमय आहे. जे आहे ते नाश होईल याचे दुख, तर जे नाही ते न मिळवण्याचे चे दुख, विरहाचे दु:ख .मनुष्य पूर्ण आयुष्यभर दु:खी असतो . म्हणून बुद्ध मानतात हे जग दु:खमय आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत आनंदाचे अनेक क्षण येतात, पण ते दीर्घकाळ टिकत नाहीत कारण जग हे क्षणभंगुर आहे. क्षणिक सुख- आपण कोणत्याही गोष्टीचा आनंद घेत असलो तरी तो कधीच शाश्वत किंवा समाधान देणारा नसतो. आणि तो अल्पावधितच दुःखात परिवर्तित होतो. ज्याला आपण साधारणपणे सुख समजतो, तेही अनेक दुःखांच्या मालिकेशी जोडले गेलेले असते.

ज्याला दु:ख नाही किवा माहित नाही असा एकही व्यक्ती जगात सापडणार नाही. जन्म दु:खकारक आहे. मूल जन्मताच दु:ख बरोबर घेऊन येते. व्याधी, आजारपण दु:खकारक आहे. म्हातारपण दु:खकारक आहे. मरण दु:खकारक आहे.आयुष्यामध्ये अनेक शोकाचे प्रसंग येतात, तेहि दु:खकारक आहे. अप्रिय पदार्थाशी किंवा प्राण्यांशी संबंध आला म्हणजे तेहि दु:खकारक आहे.

### ४.२.२ दुसरे आर्य सत्यः दु:खाला कारण आहे .

या जगा मध्ये जे काही आहे त्या सर्वांना कारण आहे . कारणा शिवाय या जगात काही होऊ शकत नाही. त्याच प्रमाणे या जगात जे दु:ख आहे त्यालाही कारण आहे, ते कारण तृष्णा किवा इच्छा हे आहे. दुःखा साठी केवळ एकच कारण नसते तर अनेक असतात. तृष्णा हे दुःखाचे मूळ आहे,. बुद्धांनी दु:ख साठी १२ कारणे (द्वादश निदान)सांगितले आहे द्वादश म्हणजे १२ करणे .

आपले दुःख आणि क्षणिक आनंद अकारण निर्माण होत नाहीत, तर अनेक प्रकारची कारणे आणि परिस्थितीतून निर्माण झालेले असतात. आपल्या भोवतालच्या समाजासारखे बाह्य घटक समस्या निर्माण करणारी परिस्थिती निर्माण करतात; पण बुद्ध आपल्याला दुःखाचे मूळ स्वतःच्या मनात शोधायला सांगतात.

परंतु दु:ख हे विधिलिखित नसते किंवा ते देवाचे देणेही नसते तर ते कारणामूळे निर्माण होते. ज्या कारणामुळे दु:ख निर्माण झाले ती कारणेच नसतील तर ते दु:ख होणार नाही. असे सांगणारे गौतम बुध्द पहिले मार्गदाते होते. त्यांनी कार्यकारण नियम किंवा प्रतित्यसमुत्पाद हया सिध्दांताचा शोध लावला. पुन्हा पुन्हा उत्पन्न होणारी, लोभ आणि विकाराने युक्त असलेली, अनेक विषयात रममाण होणारी तृष्णा हे त्या दु:खाच्या मागचे कारण असते. लोभाने किवा द्वेषाने माणसाला एखाद्या गोष्टीचा हव्यास वाटू लागतो, त्या गोष्टीसाठी तो तडफडतो, तेव्हा त्या लोभमूलक किवा द्वेषमूलक हव्यासाला तृष्णा असे म्हणतात. माणसातील लोभ, द्वेष आणि मोह या विकारांनी तृष्णा निर्माण होते. तृष्णा आहे म्हणून दु:ख आहे. तृष्णा नसेल तर दु:खही राहणार नाही.

आपल्या स्वतःच्या तणाव निर्माण करणाऱ्या भावना, तिरस्कार, असुया आणि लोभ या मुले आपण अनेक कर्म करतो आणि दु:ख निर्मिती होते.

बुद्धाच्या मते आपली वास्तवाकडे पाहण्याची पद्धत. यात आपल्या स्वभावासोबतच स्वतःच्या, इतरांच्या आणि जगाच्या अस्तित्वाबद्दलच्या तीव्र मिथ्या धारणांमुळे होणाऱ्या दीर्घकालीन परिणामांबाबतचे आपले अज्ञान आणि गोंधळ यांचाही समावेश आहे. प्रत्येकातील परस्परसंबंध न पाहताच, आपण समजतो की प्रत्येकाचे अस्तित्व स्वतंत्र आहे.

प्रतित्यसमुत्पाद हा बारा कड्याचा सिध्दांत आहे. या सिध्दांतानुसार अविद्येमुळे संस्कार उत्पन्न होतात, संस्कारामुळे विज्ञान, विज्ञानामुळे नामरुप (मन आणि शरीर), नामरुपामुळे षडायतन (सहा ईद्रीये), षडायतनामुळे स्पर्श, स्पर्शामुळे वेदना, वेदनेमुळे तृष्णा, तृष्णेमुळे उपादान (चिकटून राहणे), उपादानामुळे भव (होणे), भवमुळे जाती (जन्म), जातीमुळे जरा (वार्धक्य), मरण, शोक उत्पन्न होतात. अशा तऱ्हेने अविद्येपासून ते जरा, मरण पर्यंत दु:खाचा उगम होणाऱ्या बारा कड्यांना अनुलोम प्रतित्यसमुत्पाद असे म्हणतात. दु:खाचा उगम कसा होतो हे अनुलोम प्रतित्यसमुत्पादमध्ये सांगितले आहे.

तसेच अविद्येचा निरोध केला असता संस्काराचा निरोध होतो. संस्काराच्या निरोधाने विज्ञानाचा निरोध होतो. विज्ञानाच्या निरोधाने नामरुपाचा निरोध होतो. नामरुपाच्या निरोधाने स्पर्शाचा निरोध होतो. स्पर्शाच्या निरोधाने वेदनेचा निरोध होतो. वेदनेच्या निरोधाने तृष्णेचा निरोध होतो. तृष्णेच्या निरोधाने उपादानाचा निरोध होतो. उपादानाच्या निरोधाने भवाचा निरोध होतो. भवाच्या निरोधाने जातीचा निरोध होतो. जातीच्या निरोधाने जरा, मरण, शोक याचा निरोध होतो. याप्रमाणे दु:खाचा निरोध होतो. अशा तऱ्हेने अविद्येपासून ते जरा, मरण पर्यंत दु:खाचा निरोध करणाऱ्या बारा कड्यांना प्रतिलोम प्रतित्यसमुत्पाद असे म्हणतात. दु:खाचा निरोध कसा होतो हे प्रतिलोम प्रतित्यसमुत्पादमध्ये सांगितले आहे.

दु:खाचे उगम कसे होते व त्याचा निरोध कसा होतो याची कारणमिमांसा प्रतित्यसमुत्पादाच्या सिध्दांतानुसार गौतम बुध्दाने याप्रमाणे समजावून सांगितला आहे.

प्रतित्यसमुत्पादाचा सिध्दांत सांगतांना अविद्येपासून सुरुवात केली आहे. परंतु अविद्या हे दु:ख निर्मितीचे मूळ कारण आहे असे म्हणता येणार नाही. जगातील प्रत्येक गोष्टीचा उगम दुसऱ्या कोणत्या तरी समुत्पादाच्या गोष्टीच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. प्रतित्यसमुत्पादाच्या सिध्दांतानुसार जगात कोणतेच मूळ कारण असु शकत नाही, अविद्या म्हणजे जग जसे तसे न पाहणे, म्हणजेच दु:ख आर्यसत्याविषयी संपुर्ण ज्ञान नसणे. ज्याला आर्यसत्याविषयी संपुर्ण ज्ञान आहे. त्याच्याकडून संस्कार उत्पन्न होणार नाही, त्याच्यात तृष्णा उत्पन्न होणार नाही. म्हणजेच तो दु:खातून मुक्त होईल.

सर्व भारतीय धर्माप्रमाणे बौद्धांचाही कर्मावर व पुनर्जन्मावर विश्वास आहे. तेव्हा हे जन्ममरणाचे रहाटगाडगे कसे चालते, ह्याचे स्पष्टीकरण करणारा प्रतीत्य-समुत्पादही त्याला समजला. प्रतीत्य-समुत्पाद म्हणजे एखादी गोष्ट उत्पन्न होते ती स्वयंभू नसून काही तरी पूर्वगामी कारण परंपरेवर अवलंबून आहे. तेव्हा जन्ममृत्यू कसे होतात, ह्याचे स्पष्टीकरण करणारी कार्यकारणपरंपरा आहे. एका जन्माचा मागील व पुढील जन्मांशी कार्यकारणपरंपरेने कसा संबंध पोहोचतो, हे प्रतीत्य-समुत्पादात सांगितले आहे.

### ४.२.३ तिसरे आर्य सत्य : दुःखनिरोध आर्य सत्य:

बुद्धानी जरी पहिल्या आर्यसत्या मध्ये हे जग दुःखमय आहे असे सांगितले असले तरी तिसऱ्या आर्य आर्यसत्या मध्ये त्यानी सांगितले कि या दुःखाचा नाशही करता येऊ शकतो. या कारणास्तव बुद्धांचे तत्त्वज्ञान आशावादी होते. बुद्धानी सांगितले की या जगात जे काही निर्माण होते त्याला कारण आहे दुःखाला हि कारण आहे आणि ते कारण नष्ट केले तर दुःखाचा हि नाश होईल. हे दुःख सहन करत राहण्याची गरज नाही, कारण आपण दुःखाच्या कारणाचे समूळ उच्चाटन करू शकतो. तेव्हा त्याचा परिणामही उत्पन्न होणार नाही. एकदा आपला वास्तवाबाबतचा भ्रम मिटला की, समस्या पुन्हा निर्माणच होणार नाही. त्यांनी फक्त एक-दोन समस्यांविषयी सांगितलेले नाही- तर कोणतीच नवी समस्या निर्माण होऊ नये, यासंबंधी सांगितले आहे.

ज्या ज्या गोष्टीला एखादे कारण आहे ती ती गोष्ट, कारण नाहीसे केले म्हणजे, निरोध पावते, नष्ट होते. हे अबाधित तत्त्व आहे. म्हणून त्या दुःखाचा निरोधही होऊ शकतो, हे तिसरे आर्य-सत्य त्याला समजले. निरोध होऊ शकतो तर तो प्राप्त करून घेण्याचा मार्गही असलाच पाहिजे, हे चौथे आर्य-सत्यही त्याला कळून आले. ह्यालाच आर्य अष्टांगिक मार्ग म्हणतात.

बुद्धाने 'यथार्थ निरोध किंवा निर्मुलना'ची शिकवण दिली. त्यामुळे हे समजून घेणे आणि असा विश्वास बाळगणे आवश्यक आहे की तुमच्या भ्रमापासून आणि त्याच्या पुनरावृत्तीपासून मुक्ती मिळवणे शक्य आहे.

तुम्हाला भ्रमापासून मुक्ती मिळवण्याची चिंताच नसेल तर तुम्ही प्रयत्नही न करता परिस्थितीचा स्वीकार कराल आणि त्या परिस्थितीत शक्य असेल तसे वागाल. अनेक चिकित्सा पद्धतींचे हेच अंतिम ध्येय असते.

दु:खनिरोध हे तिसरे आर्यसत्य होय. दु:खनिरोध म्हणजेच निर्वाण. निर्वाण म्हणजेच तृष्णेपासून मुक्ती, तृष्णेचा नाश करणे. तृष्णेचा क्षय करणे. ज्याला निर्वाण प्राप्त झाले तो तृष्णेपासून मुक्त होतो. म्हणजेच त्याला कोणत्याही प्रकारचा लोभ, द्वेष, मोह राहत नाही. तृष्णेमुळे लोभ निर्माण होते. एखादी गोष्ट त्याला आवडायला लागली की, तो त्यावर आसक्त होतो. तिचा लोभ धरतो. पण तिच गोष्ट त्याला मिळाली नाही की, त्याचा द्वेष करतो. प्रत्येक गोष्ट हे अनित्य असते, असे गौतम बुध्दांनी सांगितले आहे. त्या गोष्टीचे अनित्य असलेले खरे स्वरुप न कळल्यामुळे त्याला मोह किवा भ्रांती होते. अशा तऱ्हेने तो लोभ, द्वेष, मोहाला बळी पडून दु;ख ओढवून घेतो.

दु:ख निरोधगामिनी प्रतिपदा हे चवथे आर्यसत्य होय. दु:ख निरोधगामिनी प्रतिपदा ही गौतम बुध्दाची फार महत्वाची शिकवण आहे. दु:ख निरोधगामिनी प्रतिपदा म्हणजे दु:खाचा निरोध करणाऱ्या दिशेने घेऊन जाणारा मार्ग. या मार्गानेच दु:खाचा निरोध होऊ शकतो.

जेव्हा त्या पांच परीव्राजकांनी गौतम बुध्दांना विचारले की, "दु:खाचे अस्तित्व मान्य करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हा जर धम्माचा पाया असेल तर आपला धम्म दु:ख कसे नाहिसे करतो ते सांगा" . तेव्हा गौतम बुध्द म्हणाले की, "माझ्या धम्मानूसार जर प्रत्येकांनी पावित्र्याचा, सदाचरणाचा व शिलमार्गाचा अवलंब केला तर दु:खाचा निरोध होईल."

### ४.२.४ चौथे आर्य सत्य : दु:ख निरोध आर्य सत्य

गौतम बुद्धांनी दुःख नष्ट करण्यासाठी अष्टांग मार्ग सांगितला मानवजातीच्या कल्याणासाठी हा मार्ग अतिशय महत्व असा आहे. हा अष्टांगीकमार्ग आठ अंगानीयुक्त आहे. त्याचे पालन योग्य क्रमाने आणि सातत्याने केले तर दुःखाचा नाश होऊ शकतो. गौतम बुद्धांनी या जगात दुःख आहे केवळ हेच सांगितले नाही तर दुःख नष्ट करण्याचा मार्ग हि सांगितला. त्यालाच अष्टांग मार्ग किंवा मध्यम प्रतिपदा असे म्हणतात.

## ४.३ अष्टांग मार्ग

अष्टांग मार्ग खालील प्रमाणे सांगितले आहे..

१. **सम्यक दृष्टी:** सम्यक दृष्टी- दुःखाचे ज्ञान, दुःखोदयाचे ज्ञान आणि दुःखनिरोधाचे ज्ञान याकडे हा मार्ग घेऊन डातो. दुःखाकडे सम्यक नजरेने पाहण्याची ही दृष्टी आहे.

२. **सम्यक संकल्प :** म्हणजे योग्य निर्धार करणे निष्काम तथा अनासक्ती संकल्प, अहिंसा संबंधी संकल्प किंवा अद्रोहाविषयीच्या संकल्पाला सम्यक संकल्प म्हणतात.

३. **सम्यक वाचा :** करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा (बोल) ठेवण्याचा प्रयत्न करणे. खोटे बोलणे सोडणे, चुगली न करणे, कठोर न बोलणे, वायफळ गप्पा सोडणे म्हणजे सम्यक वचन पाळणे.

४. **सम्यक कर्मांत :** उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे.प्राणी हिंसेपासून दूर रहाणे. चोरी न करणे. दिल्याशिवाय न घेणे, कामोपभोगापासून विरक्त होणे हे सम्यक कर्मांत येते

५. **सम्यक अजीविका:** जीवन जगताना मिथ्या असलेल्या गोष्टी सोडून देत जीवनभर टिकणाऱ्या चांगल्या गोष्टी तेवढ्या करणे म्हणजे सम्यक आजीव. जीवन जगताना मिथ्या असलेल्या गोष्टी सोडून देत जीवनभर टिकणाऱ्या चांगल्या गोष्टी तेवढ्या करणे म्हणजे सम्यक आजीव.

६. **सम्यक व्यायाम:** योग्य प्रयत्न करणे, आपले धाय प्राप्त करण्या साठी योग्य ते प्रयत्न करणे. पाप उत्पन्न न होऊ देण्याचा निश्चय करणे. कष्ट करणे, मनावर नियंत्रण मिळविणे. सत्यकर्म करणे हे सम्यक व्यायामात येते.

७. **सम्यक स्मृती:** तात्त्विक गोष्टींचे स्मरण करून चित्तास (मनाला) जागृत ठेवणे. वार्धक्य, मृत्यू या दैहिक अनुभवाविषयी सम्यक दृष्टी बाळगणे. राग, लोभादी अवगुणांना सोडून देणे. थोडक्यात स्मृतीत दडून बसलेल्या विकारांना बाहेर काढणे.

८. **सम्यक समाधी:** सम्यक समाधीचा रस्ता चार पायऱ्यातून जातो. पहिल्या पायरीला ध्यान करताना उगाचच येणारे विचार आणि वितर्क यांचा लोप होतो. दुसऱ्या पायरीवर प्रती, सुख व एकाग्रहता या तीन वृत्ती रहातात. तिसऱ्यामध्ये प्रीतीही निघून जाते. फक्त सुख व एकाग्रता रहाते. चौथ्या ध्यानात सुखही जाते फक्त उपेक्षा व एकाग्रता रहाते.

कोणत्याही वाईट विकारांचा स्पर्श होऊ न देता दुष्ट प्रवृत्तींपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे. दु:ख, दु:खकारण, दु:ख निरोधा व दु:ख निरोधाचा मार्ग ही बुद्धांनी सांगितलेली चार आर्यसत्ये आहेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी हा अष्टांगिक मार्ग उपयोगी पडतो.

## ४.४ अनात्मवाद

अनात्म ही एक बौद्ध संकल्पना आहे जी स्पष्ट करते की कायमस्वरूपी आत्मा किंवा आत्मतत्व अस्तित्वात नाही. 'अनात्म' हा शब्द पाली भाषेतून आला आहे आणि त्याचे भाषांतर किंवा "पदार्थाशिवाय" असे केले जाते. गौतम बुद्ध स्वतः आत्मा मानत नाही. त्यना आत्मा अमान्य होता. हे त्याचे तत्व सर्व बौद्ध पंथांनी मान्य केले आहे. बुद्ध आत्मा नावाचे नित्य शाश्वत अविकारी, अपरिवर्तनीय, अविनाशी द्रव्य आहे हे स्वीकारत नाही, विश्वातील प्रत्येक गोष्ट वस्तू घटना या क्षणी आणि प्रत्येक क्षणी बदलणारी असल्याने आत्मतत्त्व स्वीकारणे हे चुकीचे आहे असे बुद्ध म्हणतात.

या सिद्धांतानुसार, व्यक्ती प्रत्यक्षात पाच स्कंदासचा संग्रह आहे. १.रूप स्कन्द २. वेदना स्कंद ३. संज्ञा स्कंद ४. संस्कार स्कंद ५. विज्ञान स्कंद

जेव्हा सर्व स्कंद एकत्र येतात, तेव्हा स्व किंवा "मी" ची संवेदना निर्माण होते. या स्कंदा व्यतिरिक्त स्वतंत्र असा आत्मा नाही. मानवांमध्ये शाश्वत आत्मा नाही. या स्कंदांमध्ये आत्म्याचा समावेश नसतो. सर्व गोष्टी बदलत आहेत म्हणून कायमस्वरूपी आत्मा नाही. त्यांना कायमचे म्हणून आसक्ती केल्याने दु:ख आणि दुःख होते.बुद्धाच्या मते आत्मा नाही कारण काहीही कायमस्वरूपी नसते आणि सर्व काही बदलते. त्यात सतत मानसिक

प्रक्रिया बदलण्याची निरंतरता असते. स्व हे शरीर आणि चार प्रकारच्या मानसिक प्रक्रिया, आकलन, भावना, स्वभाव आणि आत्मभान यांचा एकत्रित भाग आहे.

गौतम बुद्धांनी सत्ताशात्रीय विषयावर बोलण्याचे टाळले. त्यांच्या मते मानवी दुक्खाचा नाश होणे गरजेचे आहे अस्य स्तशात्रीय संकल्पना वरती चर्चा करण्यात खूप वेळ वाया जाता आणि त्या चारच्या मधून काहीन्साध्या होत नाही,ब त्या मुले मानवाने आपल्या दुखावर लक्ष केंद्रित करून सर्व प्रथम दुःखाचा नाश केला पाहिजे. त्यांनी या विषयावर मौन बाळगले. आत्मा या संकल्पनेत इतर धर्मात महत्वाचे

गौतम बुद्धाने भवचक्राची संकल्पना मांडली. मृत्युच्या शेवटच्या क्षणी एक खोलवर ठसा उमटविलेला संस्कार (वासना/इच्छा) डोके वर काढतो, ते स्कंधान्च्या समुच्चयाला नव्या रूपस्कंधाशी (शरीराशी) जोडतो.त्यामुळे नवा जन्म मिळतो आणि आपल्याला जीवनाचे सातत्य जाणवते.

जेव्हा हा संस्कारसंचय नष्ट होतो आणि नवा संस्कार बनत नाही तेव्हा माणूस मुक्त होतो (बौद्ध शब्दावलीप्रमाणे 'निर्वाणाला' पोचतो). मग मृत्युच्या वेळी कोठलाही संस्कार आपले शीर उभारीत नाही. मग नवा जन्म मिळत नाही. यावेळी काहीच उरत नाही. आत्मासदृश काहीही उरत नाही. म्हणूनच बुद्धदर्शन शून्यवाद सांगणारे म्हणून ओळखले जाते. अन्य बहुसंख्य (काही अपवाद वगळता) भारतीय दर्शनांत मुक्तीनंतर आत्मा परमात्म्यात विलीन होतो असे म्हटले आहे. या दृष्टीने बौद्ध दर्शन वेगळे आहे. ते अनात्मवादी आहे.

बौद्ध तत्त्वज्ञाना नुसार आत्मा ही संकल्पना ही एक काल्पनिक, धारणा आहे ज्याला कोणतेही संबंधित वास्तव नाही. जिथे सर्व "मी", "माझे", स्वार्थी इच्छा, लालसा, आसक्ती इत्यादी येतात आणि दुखाची सुरुवात होते. बौद्ध धर्मानुसार हा आत्मन, "मी", आत्मा किंवा, आत्म हा केवळ खोटा विश्वास आणि माणसाचा मानसिक अंदाज आहे. म्हणूनच, बुद्धाच्या आत्म्याशिवाय च्या सिद्धांताचा अर्थ असा आहे की जग अभरीव आणि आत्मरहित आहे.

मनाची ध्यानपद्धती अस्तित्वाचे हे बदलते सार जाणून घेण्यासाठी आणि ते मान्य करण्यासाठी एक साधन म्हणून मदत करू शकते, ज्यायोगे दुःख संपवणे आहे. बौद्ध धर्मात ध्यान हे निर्वाणाच्या (ज्ञानार्हता) मार्गावरचे एक पाऊल आहे, जे अनात्म समजून घेत आहे.

अनात्म हे बौद्ध धर्मातील तीन महत्त्वाच्या तत्त्वांपैकी एक आहे, दुसरे दोन अनिक्का (सर्व अस्तित्वाचे अनित्यता) आणि दुक्खा (दुःख) आहेत. बौद्ध या तीन सिद्धांतांना "योग्य समज" म्हणून मान्यता देतात.

अआत्मा (अनात्म) हा सिद्धांत ही बौद्ध धर्माची एक महत्त्वाची तत्त्वज्ञानात्मक कल्पना आहे ज्याकडे अवलंबून असलेल्या उत्पत्तीच्या सिद्धांताचा परिणाम म्हणून पाहिले जाते. बौद्ध धर्मानुसार आत्म्याचे ज्ञान मिळू शकत नाही.

थोडक्यात, स्व किंवा आत्मा हे केवळ स्कंदा चे एकत्रित रूप आहे, आणि एकत्रित पेक्षा जास्त काही अस्तित्व नाही. अशा प्रकारे 'स्व' किंवा 'आत्मा' म्हणून ओळखला जाणारा

कोणताही वेगळा पदार्थ नाही. बुद्धांनी जरी आत्मा नाकारला असला तरी त्यांनी पुनर्जन्म मान्य केला आहे.

## ४.५ क्षणिकवाद : अनित्यवाद

हे जग व या जगातील सर्व वस्तू व घटना परिवर्तनशील आहेत या जगात काहीही स्थिर नित्य शाश्वत किंवा अमर नसते जगातली प्रत्येक वस्तू क्षणाक्षणाला बदलते यालाच क्षणिक वाद किंवा अनित्यवाद असे म्हणतात बौद्ध तत्त्वज्ञानानुसार सर्वधर्म अनित्य आहेत एका क्षणाला एक धर्म उत्पन्न होतो व तो त्याच क्षणि नष्ट होतो या मताला क्षणिकवाद असे म्हणतात. जगात अनुभूती येते एक क्षणभरच टिकते. या जगात नित्य असे काहीच नसते, बौद्ध तत्त्वज्ञानाला सर्व क्षणिकम असे म्हटले आहे.

या ब्रह्मांडात सर्व काही क्षणिक आहे. नश्वर आहे. काहाही कायमस्वरूपी रहाणारे नाही. सगळे काही बदलत जाणारे आहे. क्षणिककवादा नुसार या जगात जे काही आहे ते सर्व क्षणिक, सशर्त, सापेक्ष आणि आश्रित आहे. यालाच अनित्यतेचा सिद्धांत (अनित्यवाद) म्हणूनही ओळखले जाते. बौद्ध तत्त्वज्ञाना नुसार जग आणि त्याचे सर्व पदार्थ क्षणिक आहेत आणि कोणती हि वस्तू कायमस्वरूपी नाही. विश्व ही सतत बदलाची साखळी आहे. क्षणार्धाचा सिद्धांत आश्रित उत्पत्तीच्या सिद्धांतावर आधारित आहे. बौद्ध धर्मात क्षणार्धाच्या सिद्धांताच्या समर्थनार्थ अनेक युक्तिवाद आहेत.

ह्या बरोबरच सर्व सृष्टी ही पंचस्कंधात्मक आहे. या वेते दुसरे काही नाही. पाच स्कंध म्हणजे रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान. ह्यातील शेवटचे चार स्कंध ह्यांचा अंतर्भाव 'नाम' मध्ये होतो. ही सर्व सृष्टी व (त्यातील वस्तूही) चिरकाल टिकणारी नाही. ती अनित्य आहे. ती आज आहे उद्या नाहीशी होईल किंवा तीत फेरफार घडून येईल. ती विपरिणामधर्मी आहे. जी गोष्ट कायमची टिकणारी नाही, ती नाहीशी झाली म्हणजे साहजिकच ती बाळगणाऱ्या इसमास दुःख होते. म्हणून ती वस्तूही दुःखकारकच आहे. जी वस्तू अनित्य व दुःखकारक ती वस्तू 'आपली' असेही कोणी म्हणू इच्छिणार नाही. म्हणजे त्या वस्तूला 'आत्मा' किंवा 'आत्मीय' असेही म्हणणार नाही. तेव्हा ह्या सृष्टीतील सर्व वस्तू किंवा व्यक्ती अनित्य, दुःखकारक व अनात्म आहेत. असे जरी असले, तरी त्यांना खरे अस्तित्व आहे, हा भावना मात्र पक्की होती.

बौद्ध धर्मानुसार सर्व गोष्टी बदल आणि क्षय यांच्या अधीन आहेत. वस्तू बदलतात त्याच क्षणी नष्ट होतात. शरीर, संवेदना आणि चेतना अस्थायी आणि दु:खद आहेत. प्रत्येक गोष्ट काही अवस्थेपासून उद्भवत असल्याने जेव्हा स्थिती थांबते तेव्हा ती नाहीशी होते. बनण्याचे जग कारण-परिणाम सिद्धांताच्या (प्रतित्यसामुत्पद) नियमावर आधारित आहे.

गोष्टी त्यांच्या कारणांवर आणि परिस्थितीवर अवलंबून आहेत. जसजशी गोष्टी सापेक्ष, सशर्त, अवलंबून आणि मर्यादित असतात, तसतसे त्या क्षणिक असायला हव्यात. जर आपण असे म्हटले की एखादी गोष्ट त्याच्या कारणानुसार उद्भवते ती म्हणजे ती क्षणिक आहे हे मान्य करणे, कारण जेव्हा कारण काढून टाकले जाईल तेव्हा गोष्ट थांबेल. गोष्टी वाढल्या, जन्माला येतात आणि निर्माण झाल्या पाहिजेत, त्या मृत्यू आणि विनाशाच्या अधीन असणे आवश्यक आहे. पुन्हा, जे मृत्यू आणि विनाशाच्या अधीन आहे ते कायमस्वरूपी नाही.

जगात जे काही घडते, जे आपल्याकडून समजले जाते, ते दिसते तसे स्वाभाविकपणे क्षयकरण्याच्या अधीन आहे. बदलाचा पैलू, अनित्यतेचा पैलू आपल्या जीवनात घटना दिसून येतो या साध्या वस्तुस्थितीवरून योग्यप्रकारे दिसून येतो. वाईट क्षण किंवा चांगले क्षण कायमचे राहत नाहीत. गौतम बुद्धांनी कारण आणि परिणाम सिद्धांताच्या तत्त्वावर लक्ष केंद्रित केले आणि कोणत्याही नशिबावर किंवा नशिबावर त्यांचा विश्वास नव्हता म्हणून आपण जे काही आचरण करतो त्याचा परिणाम होईल.

प्रत्येक गोष्टीमागे एक कारण आहे. प्रत्येक परिणामाचे काही किंवा दुसरे कारण असते आणि ते शहाणपणाचे तत्त्व आहे आणि कोणतेही गूढ शक्ती किंवा अनैसर्गिक परिणाम होत नाहीत. बौद्ध धर्मकिंवा बौद्ध तत्त्वज्ञानाबद्दल माहिती असलेल्या आणि वाचलेल्या लोकांवर बौद्ध धर्माचा प्रचंड परिणाम झाला आहे.

अभूतपूर्व जगातील सर्व परिणाम अस्थायी आहेत आणि परिस्थिती, परिणाम आणि कालावधी बद्दल सर्व घटना अनिश्चित आहेत. खरंच, स्वत:बद्दलचा आपला दृष्टिकोन क्षणाक्षणाला बदलत आहे. नदी, पर्वत, पृथ्वी किंवा ग्रह यांसारख्या काही भौतिक वस्तू फुलपाखरू, सफरचंद किंवा नश्वर शरीरापेक्षा जास्त काळ भौतिक रूप टिकवून ठेवतात. तथापि, सर्व सडतील, फॉर्म बदलतील आणि वास्तविकतेतून फिके पडतील.

दुःख दूर करण्यासाठी, अनित्यतेचा अनुभव घेण्याचा सर्वात तात्कालिक मार्ग म्हणजे आपल्या संवेदनांचे निरीक्षण करणे हे आपण अनित्यता हे मध्यवर्ती वास्तव आहे हे लक्षात घेतले पाहिजे. सर्व अभूतपूर्व अस्तित्वात बदल अंतर्भूत आहे. या जगात असे काहीही नाही ज्याला आपण कायमस्वरूपी म्हणू शकतो. अनित्यतेची वस्तुस्थिती आपल्याला माहीत असायला हवी. त्यापलीकडे आपण स्वत: बदलत आहोत हे सूक्ष्म वास्तव पाहणे शिकले पाहिजे. अशा प्रकारे शारीरिक संवेदनांच्या अनित्यतेचे निरीक्षण करून, ध्यानकर्ता न झालेल्या निब्बानाच्या ध्येयाच्या जवळ जातो.

*****

munotes.in